चाचणी अहवालाची रक्कम रु 6900 /- वर 12 % GST रु 828 /- चे कंत्राटदारास जादा प्रदान झाल्याने याची संबधीतावर जवाबदारी निश्चित करुन वसुली करणे आवश्यक आहे.

वरील बाबीची पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

DATSRLM7301 (Ref No : 18, Hmm No : 1)

## *10 प्रभाग क्रं. 9 मध्ये हसणखाँ यांचे घर ते रशीद दुकानदार यांचे घरापर्यंत रस्ता खडीकरण व नाली बांधकामधील अनियमितता*

**00**
**लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020**
**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 1265525.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 13800.00/-

***13)*** मोजमाप पुस्तीकेतील मोजमापांची पडताळणी केली असता TMT Bar या बाबीचे मोजमाप घेण्यात आले नसतांनाही मोघम मोजमाप दर्शविण्यात आले.

चाचणी अहवाल नसतांनाही रु 13800 /- इतकी रक्कम मुल्यांकणामध्ये नोंदविली असल्याने कंत्राटदारास जादा प्रदान झाले आहे.

27) निधीचे नाव - 14 वा वित्त आयोग

28) प्रशासकीय मान्यता ndash; मा जिल्हाधिकारी यांचे आदेश क्र. 1207 दिनांक 06.07.2019

29) तांत्रिक मान्यता - कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जिवन प्राधीकरण . क्र. 952 दिनांक 08.03.2019

30) कंत्राटदाराचे नाव - श्री दिपक रमेश चांभारे अंदाजपत्रकीय दराने

31) मोजमाप पुस्तीका क्र. ndash; क्र. 01 पान क्र. 42 व 50

32) कामाचे प्रदान

| प्रमाणक क्र. | दिनांक | रक्कम |
|---|---|---|
| 434 | 04.02.2020 | 1265525 |

यावर लेखा परीक्षणाचे खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

6) मोजमाप पुस्तीकेतील मोजमापांची पडताळणी केली असता TMT Bar या बाबीचे मोजमाप घेण्यात आले नसतांनाही मोघम मोजमाप 2.11 Rmt व 1.10 Rmt असे नोंदविण्यात आले सदर मोजमापे नसतांनाही देयकाचे प्रदान नियमबाहय ठरते याची परीगणना करुन वसुली होणे आवश्यक आहे.
7) सार्वजनिक बांधकाम विभागाचे परिपत्रक क्रमांक जी आर-34/सा 4/5999 दिनांक 08/01/2007 नुसार बांधकामावर साहीत्य वापरण्यापुर्वी शासकीय प्रयोगशाळेचे चाचणी अहवाल प्राप्त करणे आवश्यक आहे. चाचणी अहवाल नसतांनाही मुल्यांकणामध्ये चाचणी अहवालाचे रु 13800 /- इतके मुल्यांकण केल्याने कंत्राटदारास या बाबीचे जादा प्रदान झाले असल्याने याची वसुली करणे आवश्यक आहे.

वरील बाबीची पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

DATSRLM7301 (Ref No : 19, Hmm No : 1)

## *11 नगरोस्थान मधुन पुर्ण केलेल्या कामामध्ये अंकगणितीय चुकीने जादा प्रदान होणे बाबत*

**00**
**लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020**
**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 306620.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 2923.00/-

अंकगणितीय चुकीमुळे संबधीत कंत्राटदारास रु 2923 /- जादा प्रदान करण्यात आले.

नगर पालीका मलकापुर येथील सन 2019-20 या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षणाचे वेळी नगरोस्थान निधीतुन पुर्ण केलेल्या विविधकामाचे नस्ती व मोजमाप पुस्तीकेतील मोजमापांची पडताळणी केली असता यावर लेखा परीक्षणाचे खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

14) प्रभाग 3 मध्ये श्री भागवत पवार यांचे घरापासुन ते श्री सानीगे यांचे घरापर्यत रस्ता व नाली बांधकाम

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम | कंत्राटदाराचे नाव |
|---|---|---|---|
| 104 | 23.08.2019 | 153310 | श्री अविनाश गोपाल जामोदे |

वरील कामाची मोजमाप पुस्तीकेची पडताळणी केली असता एकुण मुल्यांकणाची अंकगणितीय बेरीज ही रु 1086688 /- इतकी येत असतांना सदर बेरीज ही रु 1088188 /- इतकी जादा घेतल्याने रु 1500 /- व त्यावर 12 % GST रु 180 /- असे एकुण **रु 1680 /-** चे कंत्राटदारास जादा प्रदान झाल्याने याची संबधीतावर जवाबदारी निश्चित करुन वसुली करणे आवश्यक आहे.

33) प्रभाग 3 मध्ये श्री गणेश तायडे यांचे घरापासुन ते श्री मिरगे यांचे घरापर्यत रस्ता व नाली बांधकाम

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम | कंत्राटदाराचे नाव |
|---|---|---|---|
| 105 | 23.08.2019 | 153310 | श्री अविनाश गोपाल जामोदे |

वरील कामाची मोजमाप पुस्तीकेची पडताळणी केली असता एकुण मुल्यांकणाची अंकगणितीय बेरीज ही रु 1087078 /- इतकी येत असतांना सदर बेरीज ही रु 1088188 /- इतकी जादा घेतल्याने रु 1110 /- व त्यावर 12 % GST रु 133 /- असे एकुण **रु 1243 /-** चे कंत्राटदारास जादा प्रदान झाल्याने याची संबधीतावर जवाबदारी निश्चित करुन वसुली करणे आवश्यक आहे.

वरील जादा प्रदान रु 2923 /- वसुली करुन अनुपालन सादर करावे.

DATSRLM7301 (Ref No : 22, Hmm No : 1)

## *12 माळीवपुरा मध्ये कॉर्नरजवळ न.प.जागेवर मिनी हायमस्ट बसविणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020**
**अनियमितता संख्या : 1**

*नगर परिषद स्व-निधी व शासन निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

तात्पुरती अमान्य रक्कम रु. 127987.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 6068.00/-

अंदाजपत्रकाची तपासणी केली असता अंदाजपत्रकामध्ये सी.एस.आर.नुसार 5% बेसीक दरावर वाढीव दर ग्रामीण भागासाठी अनुज्ञेय आहे , परंतु सदर काम हे मलकापूर नगरपरीषद क्षेत्रात येत असल्यामुळे 5% वाढीव दर अनुज्ञेय ठरत नाही.

नगर परिषद मलकापूर चे सन 2019-20 लेखापरीक्षण करत असताना वरील कामाचा तपशील खालील प्रमाणे आहेत.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| प्रशासकिय मंजुरी क्रं. व दिनांक | | स्थायी समिती सभा क्र.15 दि. 05.09.2019 | | | |
| तां. मं. क्रमांक व दिनांक | | दि. 14.08.2019 | | | |
| कंत्राटदाराचे नांव | | उदय एंटरप्राईजेस | | | |
| कामाचे आदेश | | का.अ.आदेश क्रं. नपा/ विदयुत 2585 / 2019 | | | |
| मुल्यांकन | | 127400 + 12 % gst-14678 = 142688 | | | |
| देयकाचा तपशील | प्र.क्रं. | दिनांक | रक्कम | तपशील | |
| | 1242 | 15.11.19 | 108307 | प्रथम व अंतिम देयक | |

| वजाती | आयकर + सरचार्ज | उपकर | विमा | सुरक्षा ठेव 10% | कामगार विमा | नेट रू. |
|---|---|---|---|---|---|---|
| | 3282 | 1427 | 1427 | 14269 | 1223 | 127987 |

यावर लेखापरीक्षणात खालील आक्षेप नोदंविण्यात येत आहे.

1) वरील कामाचे अंदाजपत्रकाची तपासणी केली असता अंदाजपत्रकामध्ये सी.एस.आर.नुसार 5% बेसीक दरावर वाढीव दर ग्रामीण परंतु सदर काम हे नगरपरीषद क्षेत्रात येत असल्यामुळे 5% वाढीव दर अनुज्ञेय ठरत नाही ,या कामामध्ये वाढीव दर दिल्यामुळे द प्रदान दराचा तपशील खालील प्रमाणे आहेत.

| प्राकलित बाबीचा अ. क्रं. चा | बेसीक दरावर 5% वाढीव दर | अनुज्ञेय दर | फरक | मापाचा तपशिल | जादा प्रदान |
|---|---|---|---|---|---|

तपशिल

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 30972 | 29498 | 1475 | 01 | 1475 |
| 2 | 3249.75 | 3095 | 154.75 | 01 | 155 |
| 3 | 4631.55 | 4411 | 220.55 | 01 | 221 |
| 4 | 189 | 180 | 9 | 40 | 360 |
| 5 | 323.40 | 308 | 15.40 | 30 | 462 |
| 6 | 60.90 | 58.00 | 2.90 | 55 | 160 |
| 7 | 5812.80 | 5536 | 276.80 | 01 | 277 |
| 8 | 15263 | 14536 | 726.80 | 04 | 2908 |
| 9 | 162 | 154 | 7.70 | 02 | 15 |
| 10 | 75 | 71 | 3.55 | 10 | 35 |
| | | | एकुण जादा प्रदान रू | | 6068 |

वरीलप्रमाणे 5% बेसीक दरामध्ये रू. 6068/- चे जादा प्रदान झाले आहे, सबब रक्कम वसुल करण्यात यावी.

वरील आक्षेपाचे अनुपालन सादर करण्यात यावे.

DATRKPM9501 (Ref No : 28, Hmm No : 1)

## *13 लक्ष्मी नगरमध्ये विदयुत पोल व लाईट बसविणे कामावरील खर्चाबाबत.*

**00**
**लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020**
**अनियमितता संख्या : 7**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 195885.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 194872.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 1013.00/-

1) दराचे जादा प्रदान करण्यात आले आहे. 3) नगरपालीका लेखासंहीता 2011 चे नियम 124 प्रमाणे कार्यवाही

| केली नाही.व इतर अनियमितता. |
|---|

नगर परिषद मलकापुर येथील सन 2019-2020 या वित्तीय वर्षाचे लक्ष्मी नगरमध्ये विदयुत पोल व लाईट बसविणे कामावर खालील प्रमाणे निविदा प्रक्रीया राबविण्यात आली आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| प्रशासकीय मंजुरी | न.प.सर्वसाधारण सभा दि.30.1.2018 ठराव क्रं.05 नुसार प्राप्तं |
| तांत्रीक मान्यंता | अप्राप्तं |
| निविदा प्रसिध्दी | निविदा सुचना दि .25/1018 |
| प्राप्त्zwj; निविदा | एकुण तीन निविदा प्राप्त त्यापैकी सर्वात कमी दर हे साई प्रकाश इले.मलकापुर याचे अंदाजपत्रकीय दर सर्वात कमी आहे. |
| निविदा मंजुरी | वरील निविदेपैकी सर्वात कमी दर साई प्रकाश इले.मलकापुर दर रू.227773/- कमी दराची निविदा.त्यास न.प.स्थायी सभा दि.16.1.19 चे ठराव क्रं.02 अन्वये निविदा मंजुर करण्यात आली. |
| मुंल्याकन | 227773 एम.बी.क्रं.2 पान क्रं.21 ते 22 |
| करारनामा | रू.500 स्टॅम्प्zwj; पेपरवर दि.8.3.19 |
| कामाचा आदेश | मुख्याधीकारी यांचे आदेश जा क्रं.पापु/2590/19 दि.11.9.2019 |

| प्रं.क्रं. दिनांक | रक्कमं | तपशील | कपाती |
|---|---|---|---|
| 1981 16.3.20 | 227773 | साई प्रकाश इले.मलकापुर | आयकर 2.3%-4555.00<br>विमा- 1%- 2278.00<br>जीएसटी-1%- 4555.00<br>एस.डी.-10%-18222.00<br>उपकर- 1%-2278.00 |
| | | नेट रू. | 195885 |

यावर लेखापरीक्षणात खालील आक्षेप नोदंविण्यात येत आहे.

1) वरील कामाचे अंदाजपत्रकाची तपासणी केली असता अंदाजपत्रकामध्ये सी.एस.आर.नुसार 5% बेसीक दरावर वाढीव दर ग्रामीण भागासाठी अनुज्ञेय आहे , परंतु सदर काम हे मलकापुर नगरपरीषद क्षेत्रात येत असल्यामुळे 5% वाढीव दर अनुज्ञेय ठरत नाही ,या कामामध्ये वाढीव दर दिल्यामुळे दराचे जादा प्रदान झाले जादा प्रदान दराचा तपशील खालील प्रमाणे आहेत.

| प्राकलित बाबीचा अ. क्रं. चा तपशिल | बेसीक दरावर 5% वाढीव दर | अनुज्ञेय दर | फरक | मापाचा तपशिल | जादा प्रदान |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1268 | 1249 | 19 | 5 | 95 |
| 2 | 132 | 131 | 01 | 10 | 10 |
| 3 | 867 | 859 | 08 | 45 | 360 |
| 4 | 364 | 359 | 05 | 05 | 25 |
| 5 | 32303 | 32210 | 93 | 03 | 279 |
| 6 | 19295 | 19230 | 65 | 1.2 | 65 |
| 7 | 44 | 43 | 01 | 10 | 10 |
| 8 | 53 | 52 | 01 | 50 | 50 |
| 9 | 82 | 81 | 01 | 50 | 50 |
| 10 | 1299 | 1288 | 11 | 02 | 22 |
| 11 | 46 | 45 | 01 | 10 | 10 |
| 12 | 394 | 393 | 01 | 05 | 05 |
| 13 | 1531 | 1515 | 16 | 02 | 32 |
| | | | एकुण जादा प्रदान रू | | 1013 |

वरीलप्रमाणे 5% बेसीक दरामध्ये रू.1013/- चे जादा प्रदान झाले आहे, सबब रक्कम वसुल करण्यात यावी.

वरील आक्षेपाचे अनुपालन सादर करण्यात यावे.

2) नगरपालीका लेखासंहीता 2011 चे नियम 124 प्रमाणे कामाचे अदांजपत्रक बनविण्यात आले परंतु त्यास रीतसर तांत्रीक मान्यंता घेणे आवश्यंक असतांना विभागाने अशाप्रकारची कार्यवाही केली नाही.

3)कपात सुरक्षा रक्कम ठेव नोंदवहीला घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. रकमा लेख्याबाहेर ठेवण्यात आल्या सदर अनियमितता बाबत अनुपालन सादर करावे.

4) नगरपंरीषद लेखासंहीता 2011 चे नियम क्रं 120 कामाची कार्यादेश नोदंवही नमुना क्रं.12 मध्ये ठेवणे आवश्यक असतांना ठेवल्याचे आढळत नाही.

5) महाराष्ट्र नगर पालिका लेखासंहिता 2011 चे नियम 182 अन्वये केलेल्या प्रदानाबाबत धनादेश मिळाल्याची पोच घेणे आवश्यक असतांना पोच घेण्यांत आली नाही.

6) मोजमाप पुस्तीकेवर मुख्याधिकारी च अध्यंक्ष यांच्या स्वाक्ष-या आढळत नाही.

7) स्थायी निर्देश क्र.37 मधील 9 अन्वये तांत्रीक अधिका-याने मोजमापे दिनांकीत नोंदविणे आवश्यक असुन मोजमाप पुस्तीकेवर लोकप्रतिनीधी यांची स्वाक्षरी घेणे आवश्यक असतांना घेण्यात आलेल्या नाही.

DATDDSM8401 (Ref No : 42, Hmm No : 1)

## *14 प्रभाग क्रं.06 मध्ये इले.पोल उभारणे कामावरील खर्चाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020**
**अनियमितता संख्या : 7**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 186248.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 176839.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 9409.00/-

1) दराचे जादा प्रदान करण्यात आले आहे. 3) नगरपालीका लेखासंहीता 2011 चे नियम 124 प्रमाणे कार्यवाही केली नाही.व इतर अनियमितता.

नगर परिषद मलकापुर येथील सन 2019-2020 या वित्तीय वर्षाचे प्रभाग क्रं.06 मध्ये इले.पोल उभारणे कामावर खालील प्रमाणे निविदा प्रक्रीया राबविण्यात आली आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| प्रशासकीय मंजुरी | न.प.सर्वसाधारण सभा दि.13.8.2018 ठराव क्रं.41 नुसार प्राप्तं | | |
| तांत्रीक मान्यंता | अप्राप्तं | | |
| निविदा प्रसिध्दी | निविदा सुचना दि .25/1018 | | |
| प्राप्त्zwj; निविदा | एकुण तीन निविदा प्राप्त त्यापैकी सर्वात कमी दर हे निखिल इले.मलकापुर याचे अंदाजपत्रकीय दर सर्वात कमी आहे. | | |
| निविदा मंजुरी | वरील निविदेपैकी सर्वात कमी दर निखिल इले.मलकापुर दर रू.240175/- कमी दराची निविदा.त्यास न.प.स्थायी सभा दि.30.11.18 चे ठराव क्रं.06 अन्वये निविदा मंजुर करण्यात आली. | | |
| मुंल्याकन | 222518 एम.बी.क्रं.2 पान क्रं.8-9 | | |
| करारनामा | रू.100 स्टॅम्प्पेपरवर दि.3.1.19 | | |
| कामाचा आदेश | मुख्याधीकारी यांचे आदेश जा क्रं.पापु/14/19 दि.3.1.2019 | | |
| प्रं.क्रं. दिनांक | रक्कमं | तपशील | कपाती |
| 1019 20.9.19 | 222518 | निखिल इले.मलकापुर | आयकर 2.3%-5118.00<br>विमा- 1%- 2225.00<br>जीएसटी-1%- 4450.00<br>एस.डी.-10%-22252.00<br>उपकर- 1%-2225.00 |
| | | नेट रू. | 186248 |

यावर लेखापरीक्षणात खालील आक्षेप नोदंविण्यात येत आहे.

1) वरील कामाचे अंदाजपत्रकाची तपासणी केली असता अंदाजपत्रकामध्ये सी.एस.आर.नुसार 5% बेसीक दरावर वाढीव दर ग्रामीण भागासाठी अनुज्ञेय आहे , परंतु सदर काम हे मलकापुर नगरपरीषद क्षेत्रात येत असल्यामुळे 5% वाढीव दर अनुज्ञेय ठरत नाही ,या कामामध्ये वाढीव दर दिल्यामुळे दराचे जादा प्रदान झाले जादा प्रदान दराचा तपशील खालील प्रमाणे आहेत.

| प्राकलित बाबीचा अ. क्रं. चा तपशिल | बेसीक दरावर 5% वाढीव दर | अनुज्ञेय दर | फरक | मापाचा तपशिल | जादा प्रदान |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 9159.15 | 8723 | 436 | 3 | 1308 |
| 2 | 1409 | 1342 | 67 | 9 | 201 |
| 3 | 1916 | 1825 | 91 | 3 | 273 |
| 4 | 187.95 | 179 | 8.95 | 80 | 716 |
| 5 | 187.95 | 179 | 8.95 | 80 | 716 |
| 6 | 59.85 | 57 | 2.85 | 25 | 71 |
| 7 | 5761.35 | 5487 | 274.35 | 3 | 823 |
| 8 | 12381 | 11792 | 589 | 9 | 5301 |
| | | | एकुण जादा प्रदान रू | | 9409 |

वरीलप्रमाणे 5% बेसीक दरामध्ये रू.9409/- चे जादा प्रदान झाले आहे, सबब रक्कम वसुल करण्यात यावी.

वरील आक्षेपाचे अनुपालन सादर करण्यात यावे.

2) नगरपालीका लेखासंहीता 2011 चे नियम 124 प्रमाणे कामाचे अदांजपत्रक बनविण्यात आले परंतु त्यास रीतसर तांत्रीक मान्यंता घेणे आवश्यंक असतांना विभागाने अशाप्रकारची कार्यवाही केली नाही.

3)कपात सुरक्षा रक्कम ठेव नोंदवहीला घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. रकमा लेख्याबाहेर ठेवण्यात आल्या सदर अनियमितता बाबत अनुपालन सादर करावे.

4) नगरपंरीषद लेखासंहीता 2011 चे नियम क्रं 120 कामाची कार्यादेश नोदंवही नमुना क्रं.12 मध्ये ठेवणे आवश्यक असतांना ठेवल्याचे आढळत नाही.

5) महाराष्ट्र नगर पालिका लेखासंहिता 2011 चे नियम 182 अन्वये केलेल्या प्रदानाबाबत धनादेश मिळाल्याची पोच घेणे आवश्यक असतांना पोच घेण्यांत आली नाही.

6) मोजमाप पुस्तीकेवर मुख्याधिकारी च अध्यंक्ष यांच्या स्वाक्ष-या आढळत नाही.

7) स्थायी निर्देश क्र.37 मधील 9 अन्वये तांत्रीक अधिका-याने मोजमापे दिनांकीत नोंदविणे आवश्यक असुन मोजमाप पुस्तीकेवर लोकप्रतिनीधी यांची स्वाक्षरी घेणे आवश्यक असतांना घेण्यात आलेल्या नाही.

## *15 बदली प्रवास भत्ता देयका बाबत*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020**

**अनियमितता संख्या : 2**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 22305.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 18705.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 3600.00/-

1) देयकासोबत वैयक्तीक सामान वाहतुन केल्याबाबत ट्रान्सपोर्ट कंपणीचे देयक नाही. 2) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रवास-1010/प्र.क्र.2/सेवा-5 दिनांक 3 मार्च, 2010 मधील ड (4) नुसार वाहनाची वातुकीचा दर चुकीचा घेतला आहे.

नगरपरिषद मलकापूर येथील सन 2019-2020 चे लेखापरिक्षणाचे वेळी खालील प्रमाणे बदली प्रवास भत्ता देयकावर खर्च करण्यात आला आहे.

| प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|
| 930 | 31-08-2019 | 8760 | श्री.योगेश आ.सावळे, कर निर्धारण व प्रशासकीय सेवा बदली प्रवास भत्ता, मोर्शी ते मलकापूर<br>वैयक्तीक सामान वाहतूक 300 कि.मी.x7.5 = रुपये 2250<br>वाहनाची वाहतुक 300 कि.मी.x1.60 = रुपये 480<br>वेतन 9260+ग्रेड पे 2800 =12060/2 = रुपये 6030 |
| 16 | 01-04-2019 | 13545 | श्री.एस.जी.देशपांडे, कर निर्धारण व प्रशासकीय सेवा बदली प्रवास भत्ता, भुसावळ ते मलकापूर<br>वैयक्तीक सामान वाहतूक 60 कि.मी.x15 = रुपये 900<br>वाहनाची वाहतुक 60 कि.मी.x 5 = रुपये 300 |

वेतन 20290+ग्रेड पे 4400 = 24690/2 = रुपये 12345

यावर लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहे

1) देयकासोबत वैयक्तीक सामान वाहतुक केल्याबाबत श्री.सावळे व श्री.देशपांडे यांनी कोणत्याही ट्रान्सपोर्ट कंपणीचे वाहतुक देयक जोडले नाही. त्यामूळे सदर सामान वाहतूक झाल्याबाबत खात्री पटत नाही. त्यामूळे वैयक्तीक सामान वाहतुकीवर केलेला खर्च रुपये 2250/- व रुपये 900/- = रुपये 3150/- लेखापरिक्षणास मान्य करता येत नाही.

2) श्री.सावळे यांचे देयकात वाहनाची वाहतुक खर्च दर हा रुपये 1.60 येवढा घेतला असून वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रवास-1010/प्र.क्र.2/सेवा-5 दिनांक 3 मार्च, 2010 मधील ड (4) नुसार घेतला आहे. परंतू सदर ड (4) मध्ये असे नमुद आहे की, शासन निर्णयातील परिच्छेद 5 मधील तरतुदी नुसार बाळगण्यास पात्र असणाऱ्या वाहन प्रकारापैकी एका वाहनाचा वाहतुक खर्च अनुज्ञेय राहील. परंतू परिच्छेद 5 मध्ये रुपये 4200/- कमी ग्रेड पे असणाऱ्यांना मोटारसाईकल वापरण्यास परवानगी नाही. त्यांनी मोपेड/लुना किंवा अन्य वाहन वापरा सबंधी कि.मी. दिले आहे. त्यामूळे त्यांना मोटारसाईकल वाहतुक खर्च रुपये 450/- अनुज्ञेय ठरत नाही. याची वसुली होणे आवश्यक आहे.

DATDDSM8401 (Ref No : 29, Hmm No : 1)

## *16 एकच जाहीरात कमीजास्त् चौसेमी मध्ये प्रसिध्दी करणे बाबत.*

**00**
**लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020**
**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 32054.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 2624.00/-

| |
|---|
| एकच जाहीरात कमी जास्त चौसेमी मध्ये प्रसिध्दी केली आहे. |

नगरपरिषद मलकापूर येथील सन 2019-2020 चे लेखापरिक्षणाचे वेळी खालील प्रमाणे जाहीरात देयकावर खर्च करण्यात आला आहे.

| अ.क्र. | प्र.क्र. | दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|---|
| 01 | 174 | 09-04-2019 | 18278 | दै.भास्कर या वृत्तपत्रात दिनांक 08-03-2019 चे अंकात जाहीरात प्रसिध्दी 16 x 16 =256 चौ.सी.मी. @ 68 = 17408+ Gst 435+435 = 18278 |
| 02 | 907 | 28-08-2019 | 13776 | दै.विदर्भ मतदार या वृत्तपत्रात दिनांक 10-06-2019 चे अंकात जाहीरात प्रसिध्दी 16 x 20 = 320 चौ.सी.मी. @ 41 = 13120 + Gst 328+328 = 13776 |

1) उपरोक्तzwj; दोन्ही प्रमाणकान्वये एकाच कामाची निविदा जाहीरात प्रसिध्दी देण्यात आली असून प्रमाणक क्रमांक 174 नुसार सदर जाहीरात ही 256 चौ.से.मी. मध्ये प्रसिध्द केली आहे. जर हीच जाहीरात 256 चौ.से.मी. मध्ये प्रसिध्द होऊ शकते तर प्रमाणक क्रमांक 907 अन्वये सदर जाहीरात ही 256 चौ.से.मी. पेक्षा जास्त चौ.से.मी.मध्ये प्रसिध्दी करुन केवळ जाहीरातीचे बिल वाढवण्यासाठी जास्तीचे जागेत निविदा प्रसिध्द करण्यात आल्याचे दिसुन येते. तसेच सबंधीत जाहीरात प्रसीध्दी देण्यासाठी सदर विभागाने जाहीरात किती चौ.से.मी.मध्ये प्रसिध्द करावी याबाबत कुठलेच अभिलेखे वा आदेश लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही. तसेच एकच जाहीरात वेगवेळया वृत्तप्रत्रात प्रसिध्द करावयाची असल्याने सर्व वृतपत्रात एकाच चौ.से.मी.मध्ये जाहीरात प्रसिध्द करणेसाठी सबंधी एजन्सीला पत्र देणे आवश्यक असतांना विभागाने तसे पत्र वृत्तपत्र एजन्सीला न दिल्याने सबंधीत संपादकाने स्वत:चे मनाने कमी जास्त चौ.से.मी.मध्ये जाहीत प्रसिध्द केल्याने न.प.चे चुकीमूळे 256 चौ.सी.मी. ndash; 320 चौ.से.मी. = 64 चौ.सी.मी. @ दर 41/- = रुपये 2624/- चे नुकसान झाले आहे. याची वसुली होणे आवश्यक आहे.

DATDDSM8401 (Ref No : 30, Hmm No : 1)

## *17 संगणक साहीत्य खरेदी व दुरुस्ती खर्चातील अनियमितते बाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020**

**अनियमितता संख्या : 6**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 128700.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 95290.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 33410.00/-

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता, 2011 चे नियम 250 अन्वये भांडारपाल, वस्तुसुची नोंदवही मध्ये प्रत्येक

वस्तु प्रकारासाठी स्वतंत्र पृष्ठावर वस्तुसुचीची नोंद ठेविल जी नमुना क्रमांक 21 मध्ये ठेवण्यात आले नाही. दुकानदाराचे मांगणी देयकच नसतांना रक्कम अदा केल्याने महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता, 2011 चे नियम 147,150,158,159 अन्वये कार्यवाही झाली नाही. महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक सकीर्ण-2016/प्र.क्र.215/उद्योग-4 दिनांक 24 ऑगस्ट, 2017 अन्वये शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दती धोरणामध्ये सुधारणा, केंद्र शासनाने विकसित केलेल्या गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) नुसार साहीत्य खरेदी केले नाही.

नगर परिषद, मलकापूर येथील सन 2019-2020 चे लेखापरिक्षणाचे वेळी नगरपरिषदेने खालील प्रमाणे संगणक विभागाने संगणक साहीत्यवर खर्च केला आहे.

| अ.क्र. | प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम | दुकानचे नांव | तपशिल |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 1024 | 20-09-2019 | 59780 | श्री.कॉम्प्युटर्स सिसटम | संगणक साहीत्य खरेदी व दुरुस्ती |
| 02 | 1478 | 21-12-2019 | 35510 | श्री.कॉम्प्युटर्स सिसटम | संगणक साहीत्य खरेदी व दुरुस्ती |
| 03 | 1831 | 24-02-2020 | 9260 | श्री.कॉम्प्युटर्स सिसटम | संगणक साहीत्य खरेदी व दुरुस्ती |
| 04 | 1832 | 24-02-2020 | 15050 | श्री.कॉम्प्युटर्स सिसटम | संगणक साहीत्य खरेदी व दुरुस्ती |
| 05 | 1833 | 24-02-2020 | 9100 | श्री.कॉम्प्युटर्स सिसटम | संगणक साहीत्य खरेदी व दुरुस्ती |
| | | **एकूण** | **128700** | | |

यावर लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहे.

1) वरिल श्री.कॉम्प्युटर्स यांचे नोंदणी प्रमाणपत्र पहावयास मिळाले नाही. नोंदणी प्रमाणपत्र नसतांना दरपत्रक धारक / निविदाधारकास पात्र कश्याच्या आधारे ठरविण्यात आले? याबाबत सप्रमाण खुलासा करावा.

2) सदर खरेदी ही नगरपरिषद मलकापूर यांनी केली असून महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता, 2011 चे नियम

250 अन्वये भांडारपाल, वस्तुसुची नोंदवही नमुना क्रमांक 21 मध्ये ठेवण्यात येईल. वरिल प्रमाणे नगरपरिषदेने संगणक साहीत्य खरेदी केले असून त्यानुषंगाने नमुना क्रमांक 21 साठा पुस्तकाला नोंदी आढळून आल्या आहे परंतू साठा पूस्तकातील कॉलम नुसार नोदी घेण्यात आल्या नाही तसेच प्रत्येक बाबीसाठी साठापूस्तकात स्वंतंत्रय नोंद घेणे आवश्यक आसतांना एकाच पानावर सर्व नोंदी घेण्यात आल्या आहे. देयकातील दिनांक व साठा पूस्तकात नोंदविलेला दिनांकामध्ये तफावत आढळते. त्यामूळे साठापूस्तकात योग्य नोंदी घेऊन अनुपालन दर्शवावे. साहीत्य सुस्थितीत असल्याबाबत उपप्रमाणकावर प्रमाणपत्र नसल्याने खात्री करता आली नाही.

3) महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 चे नियम 147,150,158 व 159 नुसार लेखाप्रमुख, लेखापरिक्षक व सबंधीत विभागप्रमुख/अधिकारी यांनी याप्रकरणी निमाप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. तसेच गंभीर बाब म्हणजे उपरोक्त प्रमाणक क्रमांक 1831,1832 व 1833 सोबत उपप्रमाणक नाही. सदर प्रमाणकासोबत उपप्रमाणक नसतांनीसुध्दा सदर देयके मुख्याधिकाऱ्यांकडे कसे सादर केले. व मुख्याधिकाऱ्यांनीसुध्दा कोणतीही शहानिशा न करता मुळ उपप्रमाणक नसतांनीसुध्दा देयक मंजूर केले. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

4) उपरोक्त प्रमाणकांसोबत सबंधीताचे उपप्रमाणक नसल्याने सबंधीतास यापूर्वी किंवा या नंतर सदर उप प्रमाणकावर दुबार रक्कम प्रदान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. दुकानदाराचे मुळ मांगणी देयका अभावी केलेला खर्च लेखापरिक्षणास मान्य करता येत नाही. सदर रक्कम रुपये 33410/- संबधीताकडून वसुली करुन भरणा चलान अनुपालनार्थ सादर करावी.

5) महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक सकीर्ण-2016/प्र.क्र.215/उद्योग-4 दिनांक 24 ऑगस्ट, 2017 अन्वये शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दती धोरणामध्ये सुधारणा, केंद्र शासनाने विकसित केलेल्या गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलची कार्यपध्दती राज्य शासनास वस्तु व सेवा खरेदीसाठी स्विकृत केली आहे. त्यामूळे विभागाने गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) वरुन उपरोक्त साहीत्य खरेदी करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही. त्यामूळे वरिल शासन निर्णयाचे उल्लंघन झाले आहे. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

6) स्थायी निर्देश क्र.36 दिनांक 29-12-2005 मधील नियम 30 नुसार व महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम 1965 चे कलम 16 (1) नुसार नगर परिषदेच्या कोणत्याही संविदेमध्ये नगर सेवकांचा / पदाधिकाऱ्यांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभाग असणार नाही यासाठी निविदाधारकाकडून निविदा संदर्भात नगरसेवकांशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध नसल्याचे परिशिष्ट अ प्रमाणे प्रतिज्ञा पत्र घेतले नाही.

DATDDSM8401 (Ref No : 31, Hmm No : 1)

## *18 आयकर विवरणपत्रात आयकर पात्र रकमेचा समावेश न करणे बाबत*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020**

**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

गुंतलेली रक्कम रु. 22087.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 22087.00/-

आयकर अधिनियम 1961 चे कलम 5 नुसार सन 2019-2020 मध्ये मिळालेली वेतन थकबाकी वरील रकमा सन 2019-2020 या वित्तीय वर्षाचे आयकर विवरणपत्रामध्ये समाविष्ठ करणे आवश्यक असतांना कर्मचाऱ्यांच्या थकबाकी रकमा समाविष्ठ न केल्याने रुपये 22087/- चे आयकराचे नुकसान झाले आहे.

नगर परिषद, मलकापूर येथील सन 2019-2020 चे लेखापरिक्षणाचे वेळी नगरपरिषदेने शिक्षण विभागातील खालील कर्मचाऱ्यांना वरिष्ठ वेतन श्रेणी फरकाची थकबाकी प्रदान केली आहे. देयकाचा तपशिल खालील प्रमाणे.

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|
| 119 | 27-09-2019 | 47615 | रेहाना परवीन बरकत खान, स.३<br>श्रेणी फरकाची थकबाकी |

1) सन 2019-2020 या वित्तीय वर्षात वरिल कर्मचाऱ्यांना त्या वर्षातील वरिल प्रमाणे वरिष्ठ वेतन श्रेणी फरकाची थकबाकी प्रदान करण्यात आली आहे. आयकर अधिनियम 1961 चे कलम 5 नुसार कोणतेही थकबाकी रकमेची आयकर विवरणामध्ये समावेश करून त्यावर आयकर कपात करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने वरिल कर्मचाऱ्यांचे फेब्रुवारी-2020 चे वेतन देयकासोबतच्या आयकर विवरणपत्राची पडताळणी केली असता सदर कर्मचाऱ्यांचे आयकर विवरणामध्ये वरिल वेतन थकबाकीची रक्कम न दर्शविल्याने शासन महसुलाचे नुकसान झाल्याने याची संबधीतांवर जबाबदारी निश्चीत करुन रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | कर्मचा-याचे नांव | मिळालेली थकबाकी | थकबाकी समाविष्ट करुन निव्वळ आयकर प्राप्त उत्पन्न | निव्वळ भरावा लागणारा आयकर 5% + 20% + 3 % (शिक्षण कर सह) | मार्च-18 ते फेब्रुवारी-20पर्यंत भरलेला आयकर |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | रेहाना परविन बरकत | 47615 | 544718 | 12500+8944 = 21444+ 643 = 22087 | 0 | 22087 |

वरिल प्रमाणे रुपये 22087/- ची सबंधीताकडून वसुल करुन चलान अनुपालनार्थ सादर करावी.

DATDDSM8401 (Ref No : 32, Hmm No : 1)

## *19 पदवीधर शिक्षक पदावर समायोजन करुन नियमबाहय वेतनवाढ मंजूर केल्याने वेतन व भत्त्यांचे जादा प्रदाना बाबत.*

**00**
**लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020**
**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

1) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रं. वेपुर-2019/प्र.क्र.8 /सेवाmdash;9 दि. 20 फेब्रुवारी-2019 नुसार 7 वे वेतन आयोगाचे वेतन निश्चीती बाबत तथा वेतन वाढी बाबत नियम 10(2) नुसार 2 जानेवारी आणि 30 जून या कालावधीत नियुक्त झालेल्या अथवा पदोन्नत्zwj; झालेल्या कर्मचा-यास वेतन वाढ 1 जुलै ला देय नसतांना देण्यात आली आहे.

नगर परिषद मलकापुरचे सन 2019-2020 चे लेखा परिक्षणात शिक्षण विभाग अंतर्गत शिक्षकांची सेवा पुस्तके पडताळणी केली असता, खालील शिक्षकांचे पदवधीर पदावर समायोजन करुन त्यांना पदवीधर पदाची वेतनश्रेणीत निश्चीती करतांना नियमबाहय वेतन वाढ मंजूर केल्याचे निदर्शनास आले आहे.

मुख्याधिकारी नगर परिषद मलकापुर यांचे आदेश क्रं. 1421 दि. 31.05.2018 नुसार खालील सहा. शिक्षकांना पदवीधर पदावर समायोजन करुन वेतननिश्चीती करण्यात आली आहे.

| | |
|---|---|
| आबीद खान बरकत खान स.अ. | अमीर खान अजमल खान स.अ. |
| वेतन श्रेणी ndash; S-10 (2900-92300) | वेतन श्रेणी ndash; S-10 (2900-92300) |
| रुजू दिनांक- 04.06.2018 | रुजू दिनांक- 01.06.2018 |

| पदवीधर वेतनश्रेणी- S-14 (38600-122800) | | | पदवीधर वेतनश्रेणी- S-14 (38600-122800) | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | दिलेले वेतन | देय वेतन | दिनांक | दिलेले वेतन | देय वेतन |
| 01.01.2016 | 31000 | | 01.01.2016 | 31000 | |
| 01.07.2016 | 31900 | | 01.07.2016 | 31900 | |
| 01.07.2017 | 32900 | | 01.07.2017 | 32900 | |
| 04.06.2018 | 38600 | 38600 | 01.06.2018 | 38600 | 38600 |
| 01.07.2018 | 39800 | 0 | 01.07.2018 | 39800 | 0 |
| 01.07.2019 | 41000 | 39800 | 01.07.2019 | 41000 | 39800 |
| 01.07.2020 | 42200 | 41000 | 01.07.2020 | 42200 | 41000 |

1) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रं. वेपुर-2019/प्र.क्र.8 /सेवाmdash;9 दि. 20 फेब्रुवारी-2019 नुसार 7 वे वेतन आयोगाचे वेतन निश्चीती बाबत तथा वेतन वाढी बाबत नियम 10(2) नुसार 2 जानेवारी आणि 30 जून या कालावधीत नियुक्त झालेल्या अथवा पदोन्नत्zwj; झालेल्या कर्मचा-यास वेतन वाढ 1 जुलै ला देय नाही. हे पदविधर पदावर समायोजनाने दि. 04.06.2018 ला रुजू झाले असतांना त्यांना नियमबाहयपणे दि. 01.07.2018 ची वेतनवाढ मंजूर केल्याने दि. 01.07.2018 पासून आजपावेतो वेतन व भत्तयाचे जादा प्रदान झाले आहे. याबाबत दि. 01.07.2018 ला मंजूर केलेली वेतनवाढ रद्य करुन सुधारीत गणना करुन जादा प्रदान झालेल्या वेतन व भत्तयाची वसुलीची कार्यवाही करुन अनुपालन दर्शवावे.

DATDDSM8401 (Ref No : 44, Hmm No : 1)

## *20 वरीष्ठ वेतन श्रेणीची चुकीची वेतन निश्चीती केल्याने वेतन व भतत्याचे जादा प्रदाना बाबत*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020**

**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वरीष्ठ वेतन श्रेणीची चुकीची वेतन निश्चीती केल्याने वेतन व भतत्याचे जादा प्रदान झाले आहे.

नगर परिषद मलकापुरचे सन 2019-20 चे लेखा परिक्षणात शिक्षण विभाग अंतर्गत शिक्षकांची सेवा पुस्तके पडताळणी केली असता, खालील शिक्षकांचे वरीष्ठ वेतनश्रेणीत नियमबाहय वेतन वाढ देवून वेतन निश्चीती केल्याचे निदर्शनास आले आहे.

कु. रेहाना परवीन बरकत खान स.अ.

वेतन श्रेणी ndash; S-10 (2900-92300)

रुजू दिनांक- 04.06.2018

वरीष्ठ वेतनश्रेणी- S-13 (35400-112400) दि. 27.09.2018

| दिनांक | दिलेले वेतन | देय वेतन | शेरा |
|---|---|---|---|
| 01.01.2016 | 35900 | 35900 | |
| 01.07.2016 | 37000 | 37000 | |
| 01.07.2017 | 38100 | 38100 | |
| 01.07.2018 | 39200 | 39200 | |
| 22.09.2018 | 40400 | 39900 | वरीष्ठ वेतन श्रेणी<br>S-13 (35400-112400) |
| 01.07.2019 | 42300 | 41100 | |
| 01.07.2020 | 43600 | 42300 | |

शिक्षण उपसंचालक, अमरावती यांचे आदेश क्रं. 5378 दि. 27.08.2019 नुसार वरील सहा. शिक्षकांना S-10 (2900-92300) वरुन वरीष्ठ वेतन श्रेणी S-13 (35400-112400) मंजूर केली आहे. दि. 22.09.18 ला सदर वेतन श्रेणीत वेतन निश्चीती करतांना S-13 (35400-112400) मधील पुढील टप्प्यावर म्हणजे लेवल-5 वर रु. 39900 न करता लेवल-6 रु. 41100 वर वेतननिश्चीती करण्यात आली आहे. त्यामुळे जादा वेतन व भत्त्याचे प्रदान झाले आहे. याबाबतसुधारीत गणना करुन जादा प्रदान झालेल्या वेतन व भत्तयाची वसुलीची कार्यवाही करुन अनुपालन दर्शवावे.

तसेच याप्रमाणे इतर शिक्षकांचे वरीष्ठ वेतन श्रेणीची प्रकरणे तपासणी करुन सुधारीत वेतन निश्चीती करुन

वेतन व भत्त्याचे जादा प्रदानाची वसुली करण्यात यावी.

DATDDSM8401 (Ref No : 45, Hmm No : 1)

## *21 रजा लेखा अद्यावत नसणे बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020**
**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

| रजा लेखा अद्यावत नाही |
|---|

नगर परिषद, मलकापूर येथील सन 2019-2020 चे लेखापरिक्षणाचे वेळी नगरपरिषदेने आरोग्य विभागातील निवड सेवापूस्तकांची तपासणी केली असता खालील कर्मचाऱ्यांचा रजा लेखा अद्यावत नसल्याचे आढळून आले.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | रजा कालावधी | तपशिल |
|---|---|---|---|
| 01 | आनंत मनोहर चव्हान | 06-01-20 ते 06-02-20 | रजा लेखा अद्यावत नाही |
| 02 | सौ.रुकसाना बी युसुफ खॉ | 16-09-2019 ते 30-09-2019 | रजा लेखा अद्यावत नाही |
| 03 | श्री.गोवर्धन जगन ढोलकर | 21-01-2019 ते 31-1-2019 | रजा लेखा अद्यावत नाही |
| 04 | रेणे शिवराम जाझोट | 16-12-2019 ते 30-12-2019 | रजा लेखा अद्यावत नाही |
| 05 | दविदास शंकर सारसर | 24-07-2019 ते 07-08-2019 | रजा लेखा अद्यावत नाही |
| 06 | आनंद पप्पू फुटवणे | 17-07-2019 ते 31-07-2019 | रजा लेखा अद्यावत नाही |
| 07 | संजय रामलाल पिवाल | 06-03-2019 ते 19-03-2019 | रजा लेखा अद्यावत नाही |

| | | | |
|---|---|---|---|
| 08 | शिवचरण घनशाम टाक | 01-03-2019 ते 31-03-2019 | रजा लेखा अद्यावत नाही |
| 09 | गणेश रमेश सारसर | 02-12-2019 ते 09-12-2019 | रजा लेखा अद्यावत नाही |
| 10 | विशाल दविदास टाक | 01-11-2019 ते 14-11-2019 | रजा लेखा अद्यावत नाही |
| 11 | आशोक प्र.रानवे | 15-11-2019 ते 15-12-2019 | रजा लेखा अद्यावत नाही |

वरिल प्रमाणे सदर कर्मचाऱ्यांनी रजा उपभोगली असून त्याबाबत सेवापूस्तकात रजा लेखा अद्यावत करणे आवश्यक असतांना करण्यात आला नाही. सदर कर्मचाऱ्यांचा रजा लेखा अद्यावत करुन अनुपालन दर्शवावे.

DATDDSM8401 (Ref No : 33, Hmm No : 1)

## *22 पाणी पुरवठा विभाग अंतर्गत सन 2019-20 या वित्तीय वर्षासाठी जलशुध्दीकरण केद्रांवर अलम खरेदी खर्चाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020**
**अनियमितता संख्या : 5**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 400.00/-

1) महाराष्ट्रं जिवन प्राधीकरण दरसुची प्रमाणे साहीत्यं करणे आवश्यंक असतांना जादा दराने साहीत्यं खरेदी केल्याचे आढळते. 3) करारनामा कमी मुद्रांकावर केल्याचा आढळतो व इतर अनियमितता.

न.प.मलकापुर येथील सन 2019-20 च्या लेखापरीक्षणात पाणी पुरवठा विभाग अंतर्गत जलशुध्दीकरण केद्रांवर ॲलम खरेदी सन 19-20 च्या निविदा प्रक्रीयेच्या अंनुषंगीक खरेदी खर्चाची देयके सन 2019-20 मध्ये अदा करण्यात आली. खर्च प्रमाणकाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| प्रशासकीय व वित्तीय मंजुरी | न.प.सर्वसाधारण सभा दि.30.1.2018 ठराव क्रं.05 नुसार प्राप्तं |
| निविदा प्रसिध्दी | जा.क्रं./मनप/पापु/965/18 दि.3.4.2018 |

| | |
|---|---|
| प्राप्त् निविदा | एकुण पाच निविदा प्राप्तं त्यापैकी सर्वात कमी दराची निविदा पार्श्व पॉलीमर अॅन्डं केमिकल जामनेर यांची निविदा रू.6191 प्रति टन सर्वात कमी दराची प्राप्तं |
| मंजुर निविदाधारक | पार्श्व पॉलीमर अॅन्डं केमिकल जामनेर न.प. स्थायी समिती सभा दि.21.4.18 चे ठराव क्रं.08 (2) नुसार निविदा मंजुर करण्यात आली.तसेच सदर निविदेच्या दराप्रमाणे खरेदी करण्यासाठी न.प.सर्वसाधारण सभा दि.11.2.19 चे ठराव क्रं.14 नुसार मुदतवाढ आदेश देण्यात आला. |
| करारनामा | रू.100 स्टॅम्पंपेपरवर दि.12.7.18 |
| पुरवठा आदेश | मुख्याधिकारी यांचे आदेश क्रं.-- /2019 दि.20.5.19 |

| प्र.क्रं | दिनांक | रक्कमं | कपाती | तपशील |
|---|---|---|---|---|
| 1499 | 19.7.19 | 212366 | सुरक्षा रक्कंम10% -कपात नाही. | पार्श्व पॉलीमर अॅन्डं केमिकल जामनेर |
| | | | आयकर - 4884 | |
| | | | जीएसटी- 4247 | |
| | | निव्वंळ देय- 203235 | | |
| 637 | 28.6.19 | 154032 | | पार्श्व पॉलीमर अॅन्डं केमिकल जामनेर |
| | | आयकर - 3543 | | |
| | | जीएसटी - 3081 | | |
| | | निव्वंळ देय - 147408 | | |

यावर लेखापरीक्षणात खालील आक्षेप नोदंविण्यात येत आहे.

1) अॅलम खरेदी ही महाराष्ट्रं जिवन प्राधीकरण सन 18-19 च्या दरसुची प्रमाणे खरेदी करणे आवश्यंक असतांना

खुल्या बाजारातुन निविदा मागवुन ब्लिचीगं खरेदी केले तसेच दरसुची प्रमाणे निकोशेसन करणे आवश्यकं असतांना केल्याचे आढळत नाही.खुल्याबाजारातुन खरेदी बाबत खुलासा करावा.

2) महाराष्ट्रं शासन राजपत्र असाधारण भाग आठ असाधारण क्रंमाक 47 दिनांक 24 एप्रील 2015 नुसार करारनामा हा रू.500/-मुद्रांकावर करणे आवश्यंक असतांना रू.100/-वर केल्यामुळे रू.400/- शासकीय मुद्रांकाच्या रकमेचे नुकसान झाले आहे.सदर रक्कमं वसुल करण्यात यावी.

3) महाराष्ट्र नगर पालिका लेखासंहिता 2011 चे नियम 182 अन्वये केलेल्या प्रदानाबाबत धनादेश मिळाल्याची पोच घेणे आवश्यक असतांना पोच घेण्यांत आली नाही.

4) वरील देयकातुन सुरक्षा रक्कम कपात करणे आवश्यक असतांना कपात केल्याचे आढळत नाही.

5) सदर मालाचा पुरवठा विहीत मुदतीत न झाल्यामुळे पुरवठा आदेशातील अट क्रं.3 नुसार प्रतिदिन रू.100 प्रमाणे दंडाची रक्कमं परीगणना करून वसुली करण्यात यावी.

DATDDSM8401 (Ref No : 40, Hmm No : 1)

## *23 पाणी पुरवठा विभाग अंतर्गत सन 2019-20 या वित्तीय वर्षासाठी जलशुध्दीकरण केद्रांवर ब्लिचिंग खरेदी खर्चाबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020**
**अनियमितता संख्या : 5**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 400.00/-

1) महाराष्ट्रं जिवन प्राधीकरण दरसुची प्रमाणे साहीत्यं करणे आवश्यंक असतांना जादा दराने साहीत्यं खरेदी केल्याचे आढळते. 3) करारनामा कमी मुद्रांकावर केल्याचा आढळतो व इतर अनियमितता.

न.प.मलकापुर येथील सन 2019-2020 च्या लेखापरीक्षणात पाणी पुरवठा विभाग अंतर्गत जलशुध्दीकरण केद्रांवर ब्लिचिंग खरेदी सन 19-20 च्या निविदा प्रक्रीयेच्या अंनुषंगीक खरेदी खर्चाची देयके सन 2019-20 मध्ये अदा करण्यात आली. खर्च प्रमाणकाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| प्रशासकीय व वित्तीय मंजुरी | न.प.सर्वसाधारण सभा दि.30.1.2018 ठराव क्रं.05 नुसार प्राप्तं |
| निविदा प्रसिध्दी | जा.क्रं./मनप/पापु/965/18 दि.4.3.2018 |
| प्राप्त् निविदा | एकुण तीन निविदा प्राप्तं त्यापैकी सर्वात कमी दराची निविदा पार्श्व पॉलीमर ॲन्डं केमिकल जामनेर यांची निविदा रू.591 प्रति बॅग सर्वात कमी दराची निविदा. |
| मंजुर निविदाधारक | पार्श्व पॉलीमर ॲन्डं केमिकल जामनेर न.प. स्थायी समिती सभा दि.21.4.18 चे ठराव क्रं.08 (1) नुसार निविदा मंजुर करण्यात आली.तसेच सदर निविदेच्या दराप्रमाणे खरेदी करण्यासाठी न.प.सर्वसाधारण सभा दि.11.2.19 चे ठराव क्रं.14 नुसार मुदतवाढ आदेश देण्यात आला. |
| करारनामा | रू.100 स्टॅम्पंपेपरवर दि.12.7.18 |
| पुरवठा आदेश | मुख्याधिकारी यांचे आदेश क्रं.2304/2019 दि.29.8.19 |

| प्र.क्रं | दिनांक | रक्कमं | कपाती | तपशील |
|---|---|---|---|---|
| 1849 | 28.2.20 | 67100 | सुरक्षा रक्कंम10% -कपात नाही. | पार्श्व पॉलीमर ॲन्डं केमिकल जामनेर |
| | | | आयकर - 1543 | |
| | | | जीएसटी- 1342 | |
| | | निव्वंळ देय- 64215 | | |
| 640 | 28.6.19 | 59100 | | पार्श्व पॉलीमर ॲन्डं केमिकल जामनेर |
| | | आयकर - 1359 | | |
| | | जीएसटी - 1182 | | |
| | | निव्वंळ देय - 56559 | | |

यावर लेखापरीक्षणात खालील आक्षेप नोदंविण्यात येत आहे.

1 महाराष्ट्रं शासन राजपत्र असाधारण भाग आठ असाधारण क्रंमाक 47 दिनांक 24 एप्रील 2015 नुसार करारनामा हा रू.500/-मुद्रांकावर करणे आवश्यंक असतांना रू.100/-वर केल्यामुळे रू.400/- शासकीय मुद्रांकाच्या रकमेचे नुकसान झाले आहे.सदर रक्कमं वसुल करण्यात यावी.

2) महाराष्zwj;ट्र नगर पालिका लेखासंहिता 2011 चे नियम 182 अन्zwj;वये केलेल्zwj;या प्रदानाबाबत धनादेश मिळाल्zwj;याची पोच घेणे आवश्zwj;यक असतांना पोच घेण्zwj;यांत आली नाही.

3) वरील देयकातुन सुरक्षा रक्कम कपात करणे आवश्यक असतांना कपात केल्याचे आढळत नाही.

4) सदर मालाचा पुरवठा विहीत मुदतीत न झाल्यामुळे पुरवठा आदेशातील अट क्रं.3 नुसार प्रतिदिन रू.100 प्रमाणे दंडाची रक्कमं परीगणना करून वसुली करण्यात यावी.

5) मुख्याधिकारी यांचे आदेश क्रं.2304/2019 दि.29.8.19 नुसार पुरवठा आदेश दिल्याचे आढळते , पुरवठा आदेशाच्या अनुषंगीक साठा पुस्तंकाची तपासणी केली असता साठा पुस्तकं क्रं.1 दि. 13.8.2019 ला 100 नग ब्लिचिंग प्राप्तं झाल्याची नोदं आहे , त्यामुळे पुरवठा आदेश व साठा पुस्तंकातील माल साठा हा पुरवठा दिनांकापुर्वी माल प्राप्तं झाल्याची नोदं आहे ,सदर तफावती बाबत खुलासा करावा.

DATDDSM8401 (Ref No : 41, Hmm No : 1)

## *24 न प च्या वाहनात भरलेल्या इंधन व वाहन दुरुस्ती खर्चातील अनियमीततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020**
**अनियमितता संख्या : 02**

*नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 5157.00/-

***15)*** नगर परिषदेच्या वाहनात भरण्यात आलेल्या इंधनातील अनियमीतता

16) वाहनावार झालेल्या खर्चाची नोंद इतिहास पुस्तीकेत न घेता वरच्या वर करण्यात आला.

नगर परिषद मलकापूरचे सन 2019-20 चे लेखापरीक्षणावेळी वाहन विभागांतर्गत वाहन इंधन व वाहन दुरुस्ती खर्च देयकाची तपासणी केली असता खालील अनियमितता दिसून येतात.

34) वाहनांच्या लॉगबुकची व इंधन देयकाची पडताळणी केली असता खालील तपशीलाप्रमाणे त्यामध्ये तफावत आढळून आली.

वाहन क्रमांक MH28 C5939 ट्रॉली नादुरुस्त असल्या कारणाने दि. 30.11.2019 ते 17.12.2019 पर्यंत बंद होते, परंतु इंधन देयकानुसार खालील तपशीलाप्रमाणे वाहनात इंधन भरण्यात आले.

| दिनांक | चलान नं | Qty | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 06.12.2019 | 21937 | 25 | 68.49 | 1712.25 |
| 09.12.2019 | 21942 | 25 | 68.76 | 1719 |
| 17.12.2019 | 21947 | 25 | 68.76 | 1719 |
| | | | एकुण रक्कम | 5157 रुपये |

तपशीलाप्रमाणे वाहन क्रमांक MH28 C5939 इंधन भरले नसताना देखील इंधन देयकात तसे दर्शवून रुपये 5157/- चे अतिरीक्त प्रदान झालेले आहे. संबधिताकडून एकूण रक्कम 5157/- रु वसूल करण्यात येऊन त्यासंबंधी अनूपालन सादर करावे.

8) वाहनावर झालेल्या खर्चाची नोंद शासनमान्य नमुन्यात (इतिहास पुस्तीकेत) वेळोवेळी घेणे ही संबंधीताची जबाबदारी आहे मात्र खालील नमुद वाहनांवर झालेला खर्च शासनमान्य नमुन्यात न घेता साध्या रजिस्टर वर घेतला असल्याने सदर झालेला खर्च लेखपरीक्षणास मान्य करता येत नाही.

प्रमाणक क्रमांक 1212 दि. 30.10.2019 रक्कम 98800/-रु

| वाहन क्रमांक | दुरुस्ती दिनांक | रक्कम |
|---|---|---|
| MH28 H5075 | 21.09.2019 | 38600 |
| MH28 H5168 | 20.08.2019 | 36650 |
| MH28 H5167 | 20.08.2019 | 62150 |

DATRKPM9501 (Ref No : 48, Hmm No : 1)

# कलम ९ क खालील आक्षेप

## लेख्यामध्ये दाखविणे आवश्यक असतानाही लेख्यात दाखविण्यात आली नसेल अशी रक्कम

-------------------- निरंक -------------------

# भाग दोन

# सर्वसाधारण अनियमितता

# कलम ९ ड खालील आक्षेप

खंड अ,ब,क मध्ये नमूद केलेल्या बाबीं व्यतिरिक्त इतर महत्वाच्या अनुचित किंवा नियमबाह्य बाबी

## *25 अंदाजपत्रकामधील तरतुद व खर्चातील अनिमितते बाबत*

**0**

**लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020**

**अनियमितता संख्या : 6**

*नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

नगर परीषद मलकापुर येथील सन 2019-20 चे अंदाजपत्रकास स्थायी समितीचे ठराव क्र. 01 दिनांक 14.02.2020 व विशेष सभा ठराव क्र. 01 दिनांक 03.01.2020 नुसार मंजुरी घेवून मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा यांचे कडे मंजुरी साठी पाढविण्यात आला महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगीक नगरी अधिनियम 1965 चे कलम 101(1) व 1-अ नुसार अर्थसंकल्प विहीत मुदतीत तयार करुन कलम 101 (5) मधील तरतुदी नुसार आवश्यक त्या नीधीचे तरतुद अर्थसंकल्पात असल्याची खातरजमा करुनच अर्थसंकल्पास कलम 101 (4) नुसार नगरपरिषदेची 28 फेब्रुवारी पूर्वी मान्यता घेणे आवश्यक आहे व अर्थसंकल्प प्रतिवर्षी मार्च च्या पहील्या आठवडयात आवश्यक त्या सर्व प्रपत्रासह जिल्हाधीकारी यांचेकडे मान्यतेसाठी पाठविणे आवश्यक असतांना अर्थसंकल्प उशीरा पाठविल्याचे निदर्शनास येते.

नगर परीषद मलकापुर येथील सन 2019-20 चे अंदाजपत्रकास स्थायी समितीचे ठराव क्र. 01 दिनांक 14.02.2020 व विशेष सभा ठराव क्र. 01 दिनांक 03.01.2020 नुसार मंजुरी घेवून मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय मलकापुर यांचे कडे मंजुरी साठी पाढविण्यात आला त्यानुसार मा. जिल्हाधिकारी यांनी सदर अर्थसंकल्पास पत्र क्रमाक 1320 दिनांक 18.06.2020 नुसार अटी व शर्तीचे अधिन राहुन मंजुरी देण्यात आली सदर अंदाजपत्रकाची पडताळणी केली असता यावर लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत

17) मा संचालक, नगर परीषद प्रशासन संचालनालय,मुंबई यांचे विशेष परीपत्रक क्र. 5 दिनांक 13.10.2001 व दिनांक 02.02.2002 मधील निर्देशानुसार उत्पन्न वाढीसाठी उपाययोजना व काटकसरीच्या उपाययोजना करण्यात याव्यात असे निर्देश असतांना नगर परीषदेने या बाबत कोणतीही उपाययोजना केली नसल्याचे सुधारीत अंदाजपत्रकावरुन दिसुन येते. तसे महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगीक नगरी अधिनियम 1965 चे कलम 105 (1)(क) नुसार मालमत्तेवरील एकत्रित सक्तीचे करात समाविष्ट असलेल्या वृक्ष कराची अर्थसंकल्पात तरतुद आहे परंतु वसुली नाही तसेच या

कलमातील (4) नुसार जाहीरात कराची उत्पनासाठी तरतुद असतांनाही वसुली न केल्याने नगर पालीकचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे.

18) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगीक नगरी अधिनियम 1965 चे कलम 101(1) व 1-अ नुसार अर्थसंकल्प विहीत मुदतीत तयार करुन कलम 101 (5) मधील तरतुदी नुसार आवश्यक त्या त्या तरतुद अर्थसंकल्पात असल्याची खातरजमा करुनच अर्थसंकल्पास कलम 101 (4) नुसार नगरपरिषदेची 28 फेब्रुवारी पूर्वी मान्यता घेणे आवश्यक आहे व अर्थसंकल्प मागिल वर्षाचे मार्च महीण्याच्या पहील्या आठवडयात आवश्यक त्या सर्व प्रपत्रासह मा.जिल्हाधीकारी यांचेकडे मान्यतेसाठी पाठविणे आवश्यक असतांना अर्थसंकल्प उशीरा पाठविल्याचे निदर्शनास येते.

19) महाराष्ट्र नगर परीषदा, नगर पंचायती व औदयोगिक नागरी अधिनियम 1965 चे अधिनियमान्वये नगर पालीके कडे असलेले प्रलंबीत दायीत्वाबाबत तरतुद करणे आवश्यक असतांना प्रलंबीत देणी ही चालु अर्थसंकल्पातील तरतुदीमधून प्रदान केल्याचे दिसुन येते या बाबत खुलासा करावा.

20) महाराष्ट्र नगर परीषदा, नगर पंचायती व औदयोगिक नागरी अधिनियम 1965 चे अधिनियमाचे कलम 7-अ नुसार निकडीच्या परीस्थिती खेरीज कोणत्याही रक्कमा प्रदान करण्यात येवू नये असे निर्देश असतांनाही नगर पालीकेने या बाबीचे पालन केले नाही.

21) महाराष्ट्र नगर परीषदा, नगर पंचायती व औदयोगिक नागरी अधिनियम 1965 चे अधिनियमाचे कलम 7-ब नुसार निकडीच्या परीस्थिती खेरीज कोणत्याही रक्कमा प्रदान करण्यात आल्यास सदर रक्कमाना मा.जिल्हाधिकारी यांची मान्यता घेणे आवश्यक असतांना तशी मान्यता घेतल्याचे दिसुन आले नाही.

6. महाराष्ट्र नगर परीषदा, नगर पंचायती व औदयोगिक नागरी अधिनियम 1965 चे अधिनियमाचे कलम 5-ब नुसार नगर परीषदेने स्थापण्यात आलेल्या विशेष निधीना अंशदान देण्यात यावे त्या प्रमाणे कार्यवाही केली नाही.

DATSRLM7301 (Ref No : 1, Hmm No : 1)

## *26 वार्षिक लेखा प्रमाणित न करणे बाबत.*

**0**

**लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020**

**अनियमितता संख्या : 1**

*नगर परिषद स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगीक नगरी अधिनियम 1965 चे कलम 102 पोटकलम(3) अन्वये तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम 387 अनवये नमुना क्र. 81 मध्ये वार्षिक उत्पन्न व खर्चाचा गोषवारा काढुन तो स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालया कडुन प्रमाणित केल्याचे आढळुन आले नाही. |

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगीक नगरी अधिनियम 1965 चे कलम 102 पोटकलम(3) अन्वये तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम 387 अनवये नमुना क्र. 81 मध्ये वार्षिक उत्पन्न व खर्चाचा गोषवारा काढुन तो संचालक नगरपरिषद प्रशासन मुंबई व जिल्हाधिकारी यांना दिनांक 31 जुलै पर्यंत यांचेकडे पाठविणे क्रमप्राप्त आहे.तसेच महा.शासन नगरविकास विभाग यांचे परिपत्रक दिनांक 18/06/2016 अन्वये सर्वसाधारण सभेने मंजुरी दिलेले वार्षिक लेखे स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालया कडुन प्रमाणित करणे आवश्यक आहे. नगर परीषद चिखली यांनी वार्षिक लेखे तयार करुन स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालया कडुन प्रमाणित केली नाही या बाबत खुलासा करावा.

DATSRLM7301 (Ref No : 2, Hmm No : 1)

## *27 नगर पालीकेच्या चालु खात्यात जमा असलेल्या रक्कमाचा मुदत ठेव न केल्याने होत असलेल्या व्याजाचे नुकसानाबाबत*

**0**
**लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020**
**अनियमितता संख्या : 1**

*नगर परिषद स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| नगर परीषद मलकापुर सन 2019-20 या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षण करतांना सोबत जोडलेल्या विवरणानुसार दिनांक 31.03.2020 रोजी विविध बँकेच्या चालु खात्यात बऱ्याच मोठया प्रमाणात रक्कमा तश्याच उचित विनियोगा अभावी पडुन आहेत. महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाचे शासन परीपत्रक क्र.लोलेस-2016 /प्र.क्र.870 /नवि-31 दिनांक 2 मार्च 2017 नुसार योग्य नियोजना अभावी बँकेमध्ये चालु खात्यात निधी ठेवल्यास पुरेसे व्याज मिळत नसल्याने सदरचा निधी मुदत ठेव म्हणून गुंतवावा. |

नगर परीषद मलकापुर सन 2019-20 या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षण करतांना सोबत जोडलेल्या विवरणानुसार दिनांक 31.03.2020 रोजी विविध बँकेच्या चालु खात्यात बऱ्याच मोठया प्रमाणात रक्कमा तश्याच उचित विनियोगा अभावी पडुन आहेत. महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाचे शासन परीपत्रक क्र.लोलेस-2016 /प्र.क्र.870 /नवि-31 दिनांक 2 मार्च 2017 नुसार योग्य नियोजना अभावी बँकेमध्ये चालु खात्यात निधी ठेवल्यास पुरेसे व्याज मिळत नाही. असा निधी विवक्षित कामासाठी विहीत कालमर्यादेत खर्च होणार नाही असा निधी वरील परीपत्रकातील ब नुसार संबधीत प्रकल्प/ योजनेमध्ये खर्चासाठी अशा निधीची जोपर्यंत तात्काळ आवश्यकता नसेल अशा विशिष्ट कालावधीपर्यंत सदर निधी त्यावर जास्तीत जास्त व्याजदर मिळेल अशातऱ्हेने राष्ट्रीयकृत बैकेमध्ये मुदत ठेवीच्या खात्यामध्ये गुंतवण्यात यावा. असे निर्देश आहेत. अशाप्रकारे जास्तीत जास्त व्याजाची रक्कम मिळविण्यासाठी असा निधी विशिष्ट कालावधीसाठी राष्ट्रीयकृत बँकेत गुंतवण्याची संपुर्ण जवाबदारी संबधीत नगर पालीकेच्या मुख्याधिकारी यांची व्यक्तीशः जवाबदारी राहील.

दिनांक 31.03.2020 रोजी बँकेत जमा असलेला निधी उदाहरणा दाखल खालील प्रमाणे योग्य नियोजना अभावी पडुन असल्याचे दिसुन आले.

| निधीचे नाव | खाते क्रमांक | शिल्लक निधी |
|---|---|---|
| अनुसुचित नौबौध्द घरकुल | 3151003790 | 23977957 |
| 14 वा वित्त आयोग नविन खाते | 60355282494 | 115000000 |
| IHSDP खाते | 11260538121 | 23639553 |
| एकात्मीक शहर विकास योजना | 11260635330 | 17258132 |
| बांधकाम उपक्रम | 924210110003566 | 18407674 |
| 14 वा वित्त आयोग | 924210240000016 | 40381188 |
| महाराष्ट्र स्वछता अभियान | 915010043850916 | 32218559 |
| प्रधानमंत्री आवास योजना | 919010047193934 | 16639620 |
| दलीत वस्ती सुधार योजना | 20232239218 | 23435718 |

उपरोक्त परीपत्रकानुसार कार्यवाही करुन अनुपालन दर्शवावे.

## *28 नगर पालीकेच्या विविध बँक खात्यामधुन व्यवहार होत असल्याने गैरव्यवहार होण्याची शक्यता होणे बाबत*

**0**
**लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020**
**अनियमितता संख्या : 3**

*नगर परिषद स्व-निधी व शासन निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

नगर परीषद मलकापुर सन 2019-20 या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षण करतांना सोबत जोडलेल्या विवरणानुसार दिनांक 31.03.2020 रोजी विविध बँकेच्या एकुण 48 चालु खात्यामधून व्यवहार चालत असल्याने दररोज या खात्याचा ताळमेळ घेता येणे शक्य नसल्याने यामध्ये गैरव्यवहार होणे शक्य असल्याने नगर पालीकेने बँकेचे खात्यांची सख्या कमी करणे आवश्यक आहे.

नगर परीषद मलकापुर सन 2019-20 या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षण करतांना नगर परीषदेने सादर केलेल्या माहीतीचे विवरणानुसार विविध बँकेच्या एकुण 48 बँक चालु खात्यामधून व्यवहार चालला आहे. यावर लेखा परीक्षणाचे खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

22) महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 1971 चे नियम प्रमाणे नगर परिषदेच्या नीधीशी संबंधीत असलेला नीधी अथवा रक्कम ही कोषागार कींवा बँकेत ठेवण्यात यावेत नियमाप्रमाणे नीधी बँकेत ठेवण्या करीता कीमान खात्याची मर्यादा असणे आवश्यक आहे. असे असतांना नगर पालीकेने 49 वीवीध बँकेत खाते ठेवल्याने दररोज सदर खात्याचा ताळमेळ घेणे शक्य नसल्याने यामध्ये गैरव्यवहार करण्यास वाव आहे. त्यामुळे नगर पालीकेचे एकच खाते असणे आवश्यक आहे.
23) नगर परीषदेमध्ये ज्या खात्यामध्ये व्यवहार होत नाही कींवा ज्या योजना बंद केल्या आहेत अश्या खात्यावरील अखर्चीत रक्कम शासन खाती जमा करावी अथवा सर्वसाधारण सभेचा ठराव घेवून नगर पालीका फंडामध्ये रक्कमाचे जमा करण्याबाबत नियोजन करावे. जेणे करुन व्यवहार सुरळीत चालु राहतील. उदा. 10 वित्त आयोग 2 खाते, 13 वा वित्त आयोग 1 खाते , खासदार निधी 1 खाते , 12 वा वित्त आयोग 2 खाते इत्यादि.

वेगवेगळया बँकेत खाते असल्याने नगर परीषद बऱ्याच वेळा वेगवेगळया खात्यामधून नीधी खाते वर्ग

करण्याची वांरवार वेळ येते. व अशातुन गैरव्यवहार हेण्याची शक्यता असते. तरी नगर पालीकेने आपल्या खात्याची संख्या कमी करुन व पूर्तता लेखा परीक्षणास दर्शवावी

DATSRLM7301 (Ref No : 4, Hmm No : 1)

## *29 नगर पालीका मत्ता व दायीत्वा बाबत*

**0**
**लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020**
**अनियमितता संख्या : 12**

*नगर परिषद स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| नगर पालीकेची स्थिती अत्यंत असमाधान कारक आहे. त्यामूळे अनावश्य्क खर्च कमी करुन आवश्य्क कार्यवाही होणे आवश्य्क आहे. |

नगर परीषद मलकापुर येथील मत्ता व दायीत्वाची दिनांक 31.3.2020 रोजीची स्थिती बाबत सादर केलेल्या विवरणपत्रात दर्शविण्यात आलेल्या आकडेवारीवर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

24) दायीत्वामध्ये 7 वा वेतन आयोग रक्कमेचा समावेश केला नसल्याचे दिसुन येते.
25) वरिल रक्कमांचा समावेश नसल्याने जरी सन 2019-20 मध्ये मत्ता व दायीत्वाचे स्थितीवरुन दायीत्व ही 52750761/- जास्त असल्याचे दर्शविले असल्याने नगर पालीकेची स्थिती अत्यंत असमाधान कारक आहे. त्यामूळे अनावश्यक खर्च कमी करुन आश्यक कार्यवाही होणे आवश्यक आहे.
26) मालमत्ता थकीत कर वसुली अनुषंगाने आवश्य्क कार्यवाही करुन नगरपरिषद निधीत जमा करण्याची कार्यवाही करावी.
27) सन 2019-2020 मध्ये ज्या बांधकामांना परवानगी देण्यात आली त्याची नोंद कर मागणी नोंदवहीमध्ये घेऊन वसुली करणे आवश्यक आहे.
28) खर्च न केलेले अनुदान विकासात्मक कामे अनुषंगाने तसेच महसुली व भांडवली लेख्या मध्ये उत्पन्न्zwj; वाढेल या बाबीचा समावेश अंदाजपत्रकात करुन योजना राबवाव्या.
29) मत्तेच्या रकमेमध्ये थकीत कराच्यारकमेचा समावेश आहे. ती प्रत्यक्ष वसुल झाल्याशिवाय मत्ता समजल्या जाणार नाही.
30) शासनाकडून नगर परिषदेला देय असलेले अनुदानाच्या रकमा वसुल करण्या बाबत कार्यवाही व्हावी.

उदा. कमी महागाई भत्ता अनुदान, करावरील रिबेट अनुदान.

31) अदत्त देयके निरंक दर्शविण्यात आलेली आहेत. नोदंवही न ठेवल्यामूळे खरी देयता अवगत होत नाही.

32) विविध कराच्या मागणी नोंदवहया अपूर्ण असल्याने मत्ते सदरी येणे दर्शविलेल्या कराच्या थकबाकी रक्कमा तात्पुरत्या स्वरुपाच्या आहे.

33) कर्ज फेडीच्या रकमा दायीत्व बाजुला निरंक दर्शविल्या आहेत. नगर परिषदेने दिलेल्या विवरणानूसार सन 2019-20 मध्ये कर्ज परतफेड केली असल्याने दायीत्वाची दर्शविलेल्या रकमा संदिग्ध असल्याचे स्पष्ट होते.

34) मत्ता दायीत्वाचे आकडे बाबत योग्य त्या तपशिला अभावी योग्य्zwj; असल्याचे समजु शकले नाही. त्यामूळे मत्ता दायीत्वा बाबत साशंकता आहे. त्यामूळे मत्ता दायीत्वा बाबत साशंकता आहे. त्यामूळे खरे अधिक्य्zwj; / तूट कळू शकली नाही.

भांडवली खर्च उत्पन्नाशी सुसंगत ठेवणे आवश्यक आहे. संभाव्य्zwj; खर्च संभाव्य्zwj; उत्पनापेक्षा कमी राहील या बाबत योग्य्zwj; आर्थिक नियोजन करुन आर्थिक स्थिती मजबुत होण्यासाठी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तेव्हा आर्थिक स्थिती सुधारुण जमा खर्चाचे योग्य्zwj; संतुलन राखण्यासाठी कार्यवाही होणे आवश्यक आहे.

DATSRLM7301 (Ref No : 9, Hmm No : 1)

## *30 निविदा जाहिरातीतील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020**
**अनियमितता संख्या : 1**

*नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 36480.00/-

*35)* वर्तमानपत्रात जाहीरात देताना वाचक वर्ग हा मराठी भाषा असून जाहीरात हिंदी भाषेत प्रकाशीत केली.

36) जाहीरात ही कमीत कमीत आकारमानात दिलेली नाही

37) काही जाहिराती हया राष्ट्रीय वर्तमानपत्रात देण्याऐवजी स्थानिक वर्तमानपत्रात दिल्या असत्या तर बचत झाली असती.

नगर परिषद मलकापूर चे सन 2019-20 लेखापरीक्षण करत असताना निविदा जाहीरातीत खालीलप्रमाणे अनियमीतता आढळून आल्या.

35) निविदा जाहिरात वर्तमानपत्रात देत असताना कामाच्या प्रतीच्या वर्गवारीनुसार जाहीरात देणेआवश्यक आहे (वित्तीय औचीत्याचे सुत्र नियोजन). शासनमान्य राष्ट्रीय वर्तमानपत्रांचा दर हा स्थzwj;ानिक वर्तमानपत्रापेक्षा खूपच जास्त आहे, जसे की पुण्य नगरी वर्तमानपत्राचा दर हा प्रती चौ सेमी 36 रु आहे व दै.भास्कर व दै.नवभारत अनुक्रमे 68 व 122 रु जास्त आहे.

कामाच्या प्रतवारीनुसार खालील जाहीरात हया स्थानिक वृत्तमानपत्रात पुण्य नगरीत दिल्या असत्या तर जवळपास प्रती चौ सेमी दै भास्कर च्या संदर्भात रु 32/- व दै. नवभारत संदर्भात रु 86/- रु. ची बचत झाली असती. त्यामुळे खालीलप्रमाणे अतिरीक्त प्रदान झालेले आहे.

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम | वर्तमानपत्र | दर (चौ सेमी) | आकार (चौ सेमी) | दर फरक (चौ सेमी) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1109 | 09.10.2019 | 21000 | दै.सामना | 50 | 400 | 14 |
| | | | | एकुण | 400 @14 =5600 | |

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम | वर्तमानपत्र | दर (चौ सेमी) | आकार (चौ सेमी) |
|---|---|---|---|---|---|
| 897 | 19.08.2019 | 22413 | दै.भास्कर | 68 | 320 |
| | | | | एकुण | 320 @ 32 =102 |

| प्र.क्र. | दिनांक | रक्कम | वर्तमानपत्र | दर प्रती (चौ सेमी) | आकार (चौ सेमी) | दर फरक (चौ सेमी) |
|---|---|---|---|---|---|---|
| 898 | 19.08.2019 | 32793 | दै.नवभारत | 122 | 240 | 86 |
| | | | | एकुण | 240 @ 86 =20640 | |

वरील प्रमाणे कार्यवाही केली असती तर रु.36480/- ची बचत झाली असती.

9) जाहीरात देताना ती कमीत कमी आकारमानात देणे आवश्यक आहे परंतु तशा कोणत्याही प्रकारची खबरदारी घेण्यात आलेली नाही.

10) बहुभाषिक वाचक वर्ग हा मराठी (मातृभाषा) असताना जाहिरात हिंदी व इंग्रजी वर्तमानपत्रात हिंदी व इंग्रजी भाषेत देण्यात आलेली आहे.

4. इतरही निविदा जाहिरातीत वरीलप्रमाणे अनियमीतता आढळून येत आहेत. सदर कामात योग्य ती कार्यवाही करुन तसे कार्यालयास अनुपालन दर्शवावे.

DATRKPM9501 (Ref No : 27, Hmm No : 1)

## *31 रोखपुस्तंकामध्ये दैनिक तसेच मासीक गोषवारे न काढणेबाबत.*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020**

**अनियमितता संख्या : 3**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| महाराष्ट्र नगरपालीका लेखा संहिता 2011 नुसार लेखा विभागाने आपले अभिलेखे ठेवणे आवश्यंक असतांना त्याप्रमाणे अभिलेखे नगर पंचायतीने ठेवल्याचे आढळत नाही. |

नगर परीषद मलकापुर चे सन 2019-2020 चे लेखापरीक्षण केले असता सर्वसाधारण रोखपुस्तंकामध्ये तसेच विविध योजनेच्या रोखपुस्त्कामध्ये मासीक तसेच दैनिक गोषवारे काढल्याचे आढळत नाही.दैनिक तसेच मासीक गोषवारे न काढल्यामुळे रोखपुस्तंकामध्ये अंकगणीतीय तफावत असण्याची शक्यंता नाकारता येत नाही.यावर लेखापरीक्षणात खालील आक्षेप नोदंण्यात येत आहे.

1) सर्वसाधारण रोखपुस्त्क व योजनेच्या रोखपुस्तंकाची तपासणी केली असता रोखपुस्तंकामध्ये जमा बाजु व खर्च बाजुचे गोषवारे काढण्यात आलेले नाही.त्यामुळे नोदंविलेल्या खर्चाची अंकगणीतीय बेरजा व बॅक पासबुकातील जमा व खर्च रकमा याची तपासणी करता आली नाही.गोषवारे न काढल्यामुळे बॅक पासबुक व रोखपुस्तंक यामध्ये तफावत असण्याची शक्यंता नाकारता येत नाही, सदर बाब ही गंभीर स्वंरूपाची असुन यामुळे गंभीर स्वंरूपाची अनियमितता होण्याची शक्यंता नाकारता येत नाही.सदर बाब वित्तीय दृष्टीने हानीकारक असुन सदर बाबीकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात येत आहे.

2) महाराष्ट्र नगरपालीका लेखा संहिता 2011 नुसार लेखा विभागाने आपले अभिलेखे ठेवणे आवश्यंक असतांना त्याप्रमाणे अभिलेखे नगर पंचायतीने ठेवल्याचे आढळत नाही.

3) नगर पंचायतीने मुख्यं रोखपुस्तंकावर लेखापाल तसेच मुख्याधिकारी यांच्या स्वाक्ष-या आढळत नाही.

DATDDSM8401 (Ref No : 36, Hmm No : 1)

## *32 निवृत्ती वेतन विषयक नोंदवहया न ठेवणे बाबत*

**00**
**लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020**
**अनियमितता संख्या : 7**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

| लेखासंहीता 2011 नुसार विहीत नमुण्यात नोंदवहया ठेवल्याचे आढळत नाही. |
|---|

नगरपरीषद मलकापुर चे सन 2019-2020 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात पेन्शंन विभागाने खालील नियमाप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यंक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही,यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) लेखासंहिता 2011 चे नियम 135 (2) नुसार नि.वे. देयकाचे प्रदानावर लक्ष ठेवण्याचे दृष्टीने नमुना 101 मध्ये नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना तशी नोंदवही ठेवलेली नाही.

2) लेखासंहिता 2011 चे नियम 136 (1) मध्ये नमुद केल्याप्रमाणे नमुना क्रमांक 103 नि.वे. देयके काढणे अवश्यक आहे.

3) लेखासंहिता 2011 चे नियम 136 (10) (5) मध्ये नमुद केल्याप्रमाणे नमुना 140 मध्ये नि.वे. प्रदान आदेशाच्या नोंदवही ठेवली नाही.

4) नमुना 155 मधील उपदान नोंदवही ठेवली नाही.

5) निवृत्ती वेतन लेखापरिक्षा नोंदवही लेखासंहिता नियम 153 नुसार ठेवणे आवश्यक असतांना ठेवली नाही.

6) सेवा निवृत्त्zwj; झालेल्या नि.वे. धारकांची प्रदान आवेशाची नोंदवही नमुना 104 ठेवण्यात आलेली नाही.

त्यामूळे नि.वे. धारकास प्रदान केलेल्या नि.वे. कुटूंब नि.वेतन तसेच शासनाचे स्थरावरुन वेळोवेळी वाढ झालेल्या महागाई भत्याचे प्रदानाच्या नोंदी इत्यादी बाबी प्रदान आदेशाच्या नोंदवही मध्ये वेळोवेळी नोंदी घेवून नोंदवही अद्यावत ठेवणे आवश्यक सबब नि.वेतन धारकास योग्य प्रदान करण्यात येत असल्याची खातरजमा करता आली नाही.

7) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 मधील नियम 116 (4) मधील तरतुदीनुसार निवृत्ती सेवा निवृत्ती नंतर निवृत्ती वेतन धारकाचा मृत्यु झाल्यानंतर देय अनुज्ञेय असलेल्या निवृत्ती वेतनाचे प्रदानाची कार्यवाही करुन उचित निवृत्ती वेतनाचे प्रदान करण्यात येत असलयाची नोंदवही अभावी खात्री करता आली नाही.

वरिल प्रमाणे निवृत्ती वेतन नोंदवहया आद्यावत नोंदीसह तयार करुन आक्षेपाची पुर्तता करुन अनुपालन सादर करावे.

DATDDSM8401 (Ref No : 37, Hmm No : 1)

## *33 बांधकाम परवाना नोंदवही बाबत.*

**0**
**लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020**
**अनियमितता संख्या : 3**

*नगर परिषद स्व-निधी व शासन निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

| बांधकाम परवाना नोंदवही न ठेवणे बाबत |
|---|

सन 2019-20 या वर्षात नगर परिषद मलकापुर चे लेखापरिक्षणात बांधकाम परवाना नोंदवहीची पडताळणी केली असता ही नोंदवही ठेवलेली नसल्याचे आढळले. महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 चे नियम 75 (6) अन्वये नमुना 45 मध्ये ठेवणे बंधणकारक असतांना ठेवण्यात आली नाही यावर लेखा परीक्षणाचे खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1.नोंदवही नसल्यामुळे बांधकाम परवाने निर्गमीत केलेल्यार कामापैकी किती बांधकामे पुर्ण झाली व किती कामाचे बांधकामाबाबत करविभागास माहिती देण्यात आली व कर आकारणीस सुरुवात झाली या बाबतची

पडताळणी लेखापरिक्षण दरम्यान करता आलेली नाही.

2.नगर परिषद अधिनियमातील तरतुदीनुसार आरोगय निरीक्षक व करनिरीक्षक यांनी दर महिन्यास किती नविन इमारती बांधण्यांत आली या बाबतचा अहवाल कर विभागास करणे आवश्यनक आहे तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3.बांधकाम विभागाकडून बांधकामाची परवानगी दिल्यानंतर कामे पुर्ण झाल्या बाबतची प्रमाणपत्रे देखील विभगामार्फत देण्यांबत आलेली नसल्यांचे आढळले.

DATSRLM7301 (Ref No : 5, Hmm No : 1)

## *34 अपुर्ण बांधकामाबाबत*

**0**
**लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020**
**अनियमितता संख्या : 3**

*नगर परिषद स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| अपुर्ण बांधकामाबाबत |
|---|

नगर परिषद मलकापुर येथील सन 2019-20 या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षण करतांना नगर परीषदेने सादर केलेल्या विवरणानुसार नगर पालीका मलकापुर येथील बरीच कामे अपुर्ण असल्याचे दिसुन आले त्यावर लेखा परीक्षणाचे खालील प्रमाणे अभिप्राय आहे.

1 ) कामांना ज्या आर्थीक वर्षात प्रशासकीय व तांत्रीक मान्यता प्रदान करण्यांत येते त्याच आर्थीक वर्षात काम पुर्ण होणे शासनास अपेक्षीत असते अशा प्रकारे कामे वर्षानुवर्षे अपुर्ण स्थितीत राहील्यास जे काम पुर्वी झाले आहे ते सुध्दा खराब होवुन केलेला खर्च निरर्थक ठरतो. पर्यायाने स्थानिक जनतेला त्याचा फायदा होत नाही व अनुदान देण्यामागचा शासनाचा उद्देश सफल होत नाही तेव्हा अपुर्ण कामे त्वरीत पुर्ण करुन नगर पालिका लेखा संहिता 1971 नियम 177 नुसार काम पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र नमुना 133 मध्ये प्राप्त करुन अनुपालन दर्शवावे.

2) सारखी मुदतवाढ देवुनही कंत्राटदाराकडुन काम पुर्ण न केल्यास निवीदा बी-1 क्लॉज 15 (2) नुसार (कामाचा ठेका काढुन घेणे ) नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

3) कामे पुर्ण न केल्यास झालेल्या आर्थीक नुकसानीची संबधीतावर जबाबदारी निश्चीत करणे आवश्यक आहे.

DATSRLM7301 (Ref No : 7, Hmm No : 1)

## *35 करीम शेख यांचे घरापासुन ते पारपेट मेन पर्यंत रस्ता व नाली बांधकामातील अनियमितते बाबत*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020**

**अनियमितता संख्या : 2**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 471173.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 1188.00/-

***38)*** मोजमाप पुस्तीकेतील मोजमापांची पडताळणी केली असता TMT Bar या बाबीचे मोजमाप घेण्यात आले नसतांनाही मोघम मोजमाप दर्शविण्यात आले.

चाचणी अहवाल नसतांनाही रु 13800 /- इतकी रक्कम मुल्यांकणामध्ये नोंदविली असल्याने कंत्राटदारास जादा प्रदान झाले आहे.

36) निधीचे नाव - 14 वा वित्त आयोग

37) प्रशासकीय मान्यता ndash; मा जिल्हाधिकारी यांचे आदेश क्र. 1396 दिनांक 22.08.2018

38) तांत्रिक मान्यता - नस्तीत उपलब्ध नाही

39) कंत्राटदाराचे नाव - श्री दिपक रमेश चांभारे अंदाजपत्रकीय दराने

40) मोजमाप पुस्तीका क्र. ndash; क्र. 01 पान क्र. 45

41) मुल्यांकण - रु 471173

यावर लेखा परीक्षणाचे खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

11) मोजमाप पुस्तीकेतील मोजमापांची पडताळणी केली असता रस्ता खडीकरणावर 1:4:8 चे काँक्रीट चे काम न करता M- 20 सिमेंट काँक्रीटचे काम कसे केले या बाबत खुलासा करावा.

12) महाराष्ट्र वस्तु व सेवा कर कायदया अंतर्गत अधिसुचना क्र. 50/2018 राज्यकर दिनांक 18 सष्टेंबर

2018 नुसार कंत्राटदारास केवळ वस्तु व सेवा पुरविल्याबदल GST ची रक्कम देय आहे परंतु वरील कामाचे मुल्यांकणामध्ये रॉयल्टी व चाचणी अहवालावर सुध्दा GST अनुज्ञेय नसतांना या बाबीचे मुल्यांकणावर GST दिल्याने कंत्राटदारास जादा प्रदान झाले आहे.

चाचणी अहवालाची रक्कम रु 9900 /- वर 12 % GST रु 1188 /- चे कंत्राटदारास जादा प्रदान झाल्याने याची संबधीतावर जवाबदारी निश्चित करुन वसुली करणे आवश्यक आहे.

वरील बाबीची पुर्तता करुन अनुपालन दर्शवावे

DATSRLM7301 (Ref No : 20, Hmm No : 1)

### *36 बांधकाम परवाना रजिस्टंर न ठेवणेबाबत.*

**00**
**लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020**
**अनियमितता संख्या : 3**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| शासन नियमाप्रमाणे कार्यवाही न करणेबाबत. |

1] बांधकाम विभागाने बांधकाम परवानगी देताना सर्व नोदी रजिष्टर ला घेउन त्याप्रमाणे कामाचा आदेश देणे आवश्यंक आहे, व दिलेल्या कामाच्या आदेशानुसार आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत घराचे बांधकाम करणे आवश्यक असतांना, एक वर्षाच्या आत घराचे बांधकाम झाले किवां कसे याची पडताळणी परवाना नोदंवही न ठेवल्यामुळे करता आली नाही.

2] आदेशानुसार घराच्या आवारात पर्यावरण संतुलनाकरिता झाडे लावणे बंधनकारक असतांना, झाडे लावल्याबाबत प्रत्यक्ष पहाणी अहवाल घेतला किवां कसे याबाबत खात्री करता आली नाही.

3] मालमत्ता धारकांनी केलेल्या बांधकामाची यादी करविभागाकडे पाठवून चटई क्षेत्राप्रमाणे करनिर्धारण करुन त्याप्रमाणे कराची आकारणे करणे आवश्यक असतांना, आकारणी केली किवां कसे याबाबत अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्धं करण्यात आले नाही. सदर बाब न केल्यामुळे नगर परिषदेच्या उत्पनात वाढ झाली नाही.

वरील अनियमिततेबाबत अनुपालन दर्शवावे.

DATDDSM8401 (Ref No : 34, Hmm No : 1)

## *37 बांधकाम विभाग अंतर्गत देयकातुन कपात केलेली सुरक्षा रक्कमेची नोदं ठेव नोदंवहीला न घेणेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020**
**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ङ*

| नियमाप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळत नाही. |
| --- |

नगर परीषद मलकापुर येथील सन 2019-2020 अंतर्गत बांधकाम देयकाचे लेखापरीक्षण केले असता बांधकामाच्या देयकातुन कपात केलेली सुरक्षा रक्कमं नियमाप्रमाणे ठेव रजिस्टंरला घेउन दोष दायीत्वाच्या कालावधीनंतर रक्कमं ठेव नोदंवहीतुन देयकाचा प्रमाणक क्रं.दिनांक नमुद करून रकम वितरीत करणे आवश्यंक असतांना नियमाप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळत नाही.त्यामुळे सदर प्रदान हे नियमबाहय आढळते.सदर सुरक्षा रक्कमं ही केवळ मोजमापपुस्तीकेवरून प्रदान केल्याचे आढळते.त्यामुळे कामाच्या दोष दायीत्वापुर्वी रक्कम प्रदान केल्याची शक्यता नाकारता येत नाही.नियमबाहयतेबाबत साधार खुलासा करावा.

DATDDSM8401 (Ref No : 35, Hmm No : 1)

## *38 निवृत्ती वेतन विषयक नोंदवहया न ठेवणे बाबत*

**0**
**लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020**
**अनियमितता संख्या : 7**

*नगर परिषद स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ङ*

सेवानिवृत्ती वेतन प्रदानाबाबत विविध नोंदवहया नाहीत. त्यामुळे दिलेली पेंशन ही योग्य दराने दिलेबाबत तपासणी करता आली नाही.

नगरपरिषद मलकापुर चे लेखापरीक्षण करते वेळी सन 2019-20 पर्यंत निवडक महिन्यातील निवृत्ती वेतन देयकाची पडताळणी केली असता खालील उणीवा आढळून आल्या.

1.लेखा संहिता नियम 135 (2) नुसार निवृत्ती वेतन विषयक देयकाचे प्रदानावर लक्ष ठेवण्याच्या दृष्टीने नमुना 101 मध्ये नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. व त्यात प्रत्येक निवृत्ती वेतन धारकासाठी वेगळे ठेवलेल्या पानावर निवृत्ती वेतनाची रक्कम नमुद केली पाहीजे परंतु नियमाप्रमाणे संबंधीत निवृत्ती वेतन धारकांना किती निवृत्तीवेतन अनुज्ञेय आहे त्याबाबत नोंद नाही. त्यामुळे योग्य दराने पेंशन दिल्याची खात्री करता आली नाही.सदरनिवृत्ती वेतन नोंदवही अपुर्ण आहे

2.लेखा संहिता 1971 चे नियम 136 (10) (5) मध्ये नमुद केल्याप्रमाणे नमुना 140 मध्ये निवृत्ती वेतन प्रदान आदेशाचा नोंदवही ठेवली नाही.

39) निवृत्ती वेतन, लेखापरिक्षा नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना ठेवलेली नाही.
40) सेवा निवृत्त झालेल्या निवृत्ती वेतन धारकांची प्रदान आदेशाची नोंदवही नमुना 104 ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे निवृत्ती वेतन धारकास प्रदान केलेल्या निवृत्ती वेतनाची, कुटूंब निवृत्ती वेतनाची तसेच शासनाचे स्थरावरून वेळोवेळी वाढ झालेल्या महागाई भत्याचे प्रदानाच्या नोंदी इत्यादी बाबी प्रदान आदेशाच्या नोंदवही मध्ये वेळोवेळी नोंदी घेवून नोंदवही अद्यावत ठेवणे आवश्यक आहे. सबब निवृत्ती वेतन धारकास योग्य प्रदान करण्यांत येत असल्याची खातरजमा करता आली नाही.
41) न.पा. लेखा संहिता 1971 चे नियम 136 (7) मधील तरतुदी नुसार लेखापरीक्षण चालु असलेल्चया पुर्वीच्या वर्षात सेवानिवृत्त झालेल्या निवृत्ती वेतन धारकांची प्रकरणे उत्तर लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाली नाही.

6. न.पा. लेखा संहिता 1971 चे नियम 136 (6) मधील तरतुदी नुसार निवृत्ती वेतनाचे व अंशराशीकरणाचे निवृत्ती वेतनधारकास प्रदान करण्यांत आल्यानंतर ज्या महिन्यापासून निवृत्ती वेतनाच्या दरात बदल होईल व दिवसापासून निवृत्ती वेतनामधून निवृत्ती वेतनाच्या 1/3 भाग अभिकरण निवृत्ती वेतनाचे प्रदान करण्यांत येईल. परंतु तशी अद्यावत नोंदवही ठेवण्यांत आली नसल्यामुळे तपासणी करता आली नाही.

42) सेवानिवृत्ती वेतनधारकांबाबत उपदान नोदंवही, पेंशन विक्री नोंदवही, व हयातीचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणास प्राप्त झाले नाही.

वरील प्रमाणे निवृत्तीवेतन नोंदवहया अद्यावत नोंदीसह तयार करून आक्षेपाची पुर्तता करून अनुपालन सादर करावे.

DATSRLM7301 (Ref No : 6, Hmm No : 1)

## *39 दुहेरी नोंद पध्दतीची अंमलबजावणी न करणे बाबत*

**0**

**लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020**

**अनियमितता संख्या : 10**

*नगर परिषद स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| शासन आदेशानुसार दुहेरी नोंद पध्दतीची अंमलबजावणी नगर पालीकेने केली नाही. |

नगर परिषद मलकापुर येथील सन 2019-20 चे लेखापरिक्षण करत असतांना नगर परिषदेने लेखे, अभिलेखे दुहेरी नोद लेखा पध्दतीने ठेवणे गरजेचे होते परंतु नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक /लेखास 102004171 प्र.क्रं. 51/कावि 31 मंत्रालय मुंबई 6 जुलै 2005 अन्वये क वर्ग नगर पालिकेस दुहेरी नोद लेखा पध्दतीने लेखे ठेवण्यासाठी सुचीत केले होते व त्याची अंमलबाजावणी 1 एप्रिल 2005 पासुन धरण्याचे निर्देश होते, परंतु त्याप्रमाणे लेखापरिक्षण कालावधी 2018-19 पर्यत अंमलबजावणी केली नसल्याचे दिसून येते.

उपरोक्त नियमाप्रमाणे कार्यवाहजी करुन लेखे ठेवले असते तर

1) नगर परिषदेची पत किती आहे ते कळू शकले असते.

2) नगर परिषदेची मत्ता व दायित्व विवरणाची सत्यता पडताळता आली नाही

3) नगर परिषदेचे देणे किती आहे व येणे किती आहे कळाली असती

4) न.प.तर्फे दिलेले अग्रीम सन अग्रीम व इतर अग्रीमे याबाबत किती दिले व किती येणे आहे याबाबत माहिती कळली असते.

5) वाहन खर्चा बाबत वाहन निहाय खर्च किती झाला त्यावर घसारा किती आकारला याची माहिती व भाडयाचे वाहन निहाय खर्च कळला असता

6) न.प.मध्ये कार्यरत असलेल्या प्रत्येक कर्मचारी निहाय विभाग निहाय प्रत्येक कर्मचाऱ्यावर झालेला खर्च व प्रतयेक कर्मचारी निहाय शासनाच्या कपाती उदा.भनिनि आयकर वैगरे याचा वर्षाच्या शेवटी मेळ घेता आला असता.

7) बांधकामाच्या बाबतीत योजना निहाय रस्ते बांधकाम गटार वगैरे कामनिहाय वर्षाच्या शेवटी गोषवारा दिसून आला असता

8) इलेक्ट्रलीक, कार्यालयीन खर्च कर्मचारी पगार खर्च कोन बील इलेक्ट्रीक मीटर बील बांधकाम मानधन यावरील व इतर खर्चावरील खर्चाच्या नोंदी द्विनोंद पध्दतीने ठेवले असते तर मासिक तिमाही सहामाही व वार्षीक खर्च समजू शकलो असतो.

9) त्याचप्रमाणे एकूण्या वृक्षकर,घरपटटी नळपट्टी व इतर करापासुन नगर परिषदेस किती रक्कम मिळाली त्यातुन शासनास किती भरली व किती रक्कम देणे आहे याचा मेळ सहजासहजी घेता आला असता.

10) उपरोक्त उत्पन्न व खर्च याचा मेळ बँक खत्याशी घेऊन बँक ताळमेळ पडताळता आले असते व त्यावरुन वर्षाच्या शेवटी मत्ता व दायित्व विवरणप तयार झाले असते त्यावरुन एकंदरीत नगर परिषदेने दायित्व किती आहेत व नगर परिषदेची पत दिसली असती व अवाजवी खर्चास आळा घालून पत वाढविण्यास मतद झाली असती.

तरी तात्काळ नियमाप्रमाणे कार्यवाही करुन द्विबोध लेखा पध्दतीने लेखे/अभिलेखे ठेऊन पूर्तता दर्शवावी व वर्ष 2019-20 मध्ये झालेल्या जमा व खर्चा संबंधी सत्यता व पारदर्शकता असल्याची खात्री करुन पुर्तता दर्शवावी.

DATSRLM7301 (Ref No : 8, Hmm No : 1)

## *40 शासकीय अनुदानाच्या रक्कम तश्याच विणा वापर पडुन असल्याने होत असलेल्या नगर पालीकेच्या नुकसानी बाबत*

**0**

**लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020**

**अनियमितता संख्या : 5**

*शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 7098414.00 /-

शासकीय अनुदानाच्या रक्कमा तश्याच विणा वापर पडून असल्याने नगर पालीकेचे नुकसान होत असुन

बऱ्याच योजना बंद असुनही त्यांचे खात्यात तशीच रक्कम शिल्लक आहे.

नगर परीषद मलकापुर येथील सन 2019-20 चे लेखा परिक्षणाचे वेळी वेगवेगळया शासकीय अनुदानाचे रोखपुस्तक, बँक पासबुक व • गुंतवणुक नोंदवही नमुना क्र. 142 ची पडताळणी केली असता खालील प्रमाणे बऱ्याच कालावधीपासुन शासकीय अनुदानाच्या रक्कमा पडून असल्याचे दिसुन आले.

| अ क्र. | निधीचे नाव | लेखा परिक्षण दिनांकाचे रोजी शिल्लक असलेली रक्कम | केंव्हा पासुन पडुन असल्याचे दिनांक व सन |
|---|---|---|---|
| 1 | युरीफ योजना खाते | 62586.59 | योजना बंद |
| 2 | विदर्भ वैधानिक निधी | 9905.00 | निधी अभावी बंद |
| 3 | खासदार निधी | 00 | निधी अभावी बंद |
| 4 | 12 वा वित्त आयोग घनकचरा | 2972690.00 | योजना बंद |
| 5 | 12 वा वित्त आयोग विकास कामे | 195692.00 | योजना बंद |
| 6 | 10 वा वित्त आयोग | 604782.56 | योजना बंद |
| 7 | 11 वा वित्त आयोग | 2439542.74 | योजना बंद |
| 8 | 13 वा वित्त आयोग | 364.54 | योजना बंद |
| 9 | अल्पसंख्यांक निधी | 306671.56 | निधी अभावी बंद |
| 10 | युडी 6 | 9276.23 | निधी अभावी बंद |
| 11 | महाराष्ट्र सुजल खाते | 101.73 | योजना बंद |
| 12 | जनगणना खाते | 4194.65 | योजना बंद |
| 13 | जनगणना खाते | 9995.00 | योजना बंद |
| 14 | निवडणूक खाते | 314947.00 | योजना बंद |

| | | | |
|---|---|---|---|
| 15 | अल्पबचत विदर्भ | 167665.00 | योजना बंद |
| | एकुण रु | 7098414.60 | |

यांवर लेखा परिक्षणाचे खालील प्रमाणे अभिप्राय आहेत

42) उपरोक्त दर्शविल्या प्रमाणे वरील 10 खात्यामध्ये रु 7098414.60 /- तशीच पडुन आहे. वरील खाते त्वरीत बंद करुन हा निधी गुंतवणूक करुन तसे अनुपालन दर्शवावे.

43) नगर पालीका मलकापुर येथे एकुण 48 बँक खात्यामध्ये 35 कोटीच्या जवळपास रक्कम तशीच पडुन असल्याचे दिसुन आले. जर सदर रक्कमेची गुंतवणूक केली असती तर निश्चितच बऱ्याच मोठया प्रमाणात नगर पालीकेला व्याजा पासुन मिळालेल्या रक्कमेचा आर्थीक फायदा झाला असता पर्यायाने नगर पालीकेतील हदीतील नागरीकांना सदर निधीचा सार्वजनिक विकास कामास मदत मिळाली असती परंतु नगर पालीकेने तशी कार्यवाही न केल्याने नागरीक विकास कामापासुन वंचित राहीले आहेत यावर त्वरीत उपाययोजना करुन तशी कार्यवाही करणे आवश्यक आहे.

44) नगर पालीका मलकापुर येथे एकुण 15 बँक खात्या मध्ये बहुतांश योजना हया बंद आहेत कींवा या नंतर या खात्यामध्ये अनुदान प्राप्त होणार नसतांना शासकीय अनुदानाच्या रक्कम तश्याच पडून असल्याने विकास कामे होत नाही तरी सदर रक्कमा शासनास परत करव्या अन्यथा सदर खाते बंद करुन हा निधी नगर पालीका निधीत जमा करुन विकास कामासाठी वापरण्यात येवून तसे अनुपालन दर्शवावे.

45) इतक्या मोठया प्रमाणात शासकीय अनुदानाच्या रक्कमा तश्याच विणा वापर पडुन असल्याने सदर अर्खीत रक्कमा खर्च होत नसल्याने शासनास परत न करणे बाबत खुलासा करावा.

5. महाराष्ट्र नगर पालीका लेखा संहीता 1971 चे नियम क्रमांक 187 नुसार क्र 142 मधील प्रत्येक नोंद मुख्याधिकारी यांचे सहीने सांक्षाकीत करणे आवश्यक आहे सरकारी रोखे व इतर गुतवणकीपासुन वेगळे ठेवावयाचे आहे विश्वस्थ्zwj;. निधीच्या गुतवणुका सर्व साधारण नधीपासुन वेगवेगळया ठैवण्यात येतील या प्रमाणे कार्यवाही केली जात नसल्याचे आढळते नोंदवहीत नोंदी घेतलेल्या आहेत परंतु गुंतवणुक नोदवही नमुना क्र 142 मधील सर्व रकाने अदयावत नोंदी घेतलेल्या नाहीत

DATSRLM7301 (Ref No : 10, Hmm No : 1)

## *41 बांधकाम विभाग अंतर्गत देयकातुन कपात केलेली सुरक्षा रक्कमेची नोदं ठेव नोदंवहीला न घेणेबाबत.*

**0**

**लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020**

**अनियमितता संख्या : 1**

*नगर परिषद स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

| |
|---|
| नियमाप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळत नाही. |

नगर परीषद मलकापुर येथील सन 2019-20 अंतर्गत बांधकाम देयकाचे लेखापरीक्षण केले असता बांधकामाच्या देयकातुन कपात केलेली सुरक्षा रक्कमं नियमाप्रमाणे ठेव रजिस्टंरला घेउन दोष दायीत्वाच्या कालावधीनंतर रक्कमं ठेव नोदंवहीतुन देयकाचा प्रमाणक क्रं.दिनांक नमुद करून रकम वितरीत करणे आवश्यंक असतांना नियमाप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळत नाही.त्यामुळे सदर प्रदान हे नियमबाहय आढळते.सदर सुरक्षा रक्कमं ही केवळ मोजमापपुस्तीकेवरून प्रदान केल्याचे आढळते.त्यामुळे कामाच्या दोष दायीत्वापुर्वी रक्कम प्रदान केल्याची शक्यता नाकारता येत नाही.नियमबाहयतेबाबत साधार खुलासा करावा.

DATSRLM7301 (Ref No : 11, Hmm No : 1)

## *42 भांडार विभागातील छपाई खर्चा बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020**
**अनियमितता संख्या : 04**

*लेखा शीर्ष : सादील नगर परिषद स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 384339.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 384339.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 400.00/-

***46)*** छपाइ साहित्याची साठा नोंदवहीत नोंद करण्यात आलेली नाही.

47) साहित्याची वाटप रजिस्टर अद्ययावत ठेवण्यात आलेली नाही.

48) तुलनात्मक तक्त्यावर मुख्याधिका-याची स्वाक्षरी करून प्रमाणित करण्यात आलेली नाही.

49) करारनामा रु.500 ऐवजी रु.100 च्या मुद्रांक पेपरवर केल्याने रु.400 ची शासन हानी करण्यात झाल्याची दिसून येते.

नगर परिषद मलकापुर येथील सन 2019-20 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षण कालवधीत भांडार विभागात छपाई साहित्यावर पुढील प्रमाणे खर्च झाल्याचे दिसून येते.

| प्र.क्र | दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|
| 572 | 24/06/2019 | 193939 | परायनी ग्रफिक्स बुलडाना (उप प्र.क्र.19 दि.22/05/2019 ) |
| 1774 | 25/02/2020 | 190400 | परायनी ग्रफिक्स बुलडाना (उप प्र.क्र.50 दि.नमुद नाही ) |
| | एकूण | 384339 | |

यावर अभिप्राय पुढील प्रमाणे

43) वस्तुसूची नमुना क्र.21 ची पडताळणी केली असता खरेदी केलेल्या छपाई साहित्याची नोंद त्यात दिसून आली नाही. तसेच सदरच्या खरेदी साहित्याची वितरणाची नोंद नोंदवहीत आढळून न आल्याने छपाई साहित्याचा कोणत्या प्रकारे विनियोजन झाला याची लेखापरीक्षणास खात्री पटत नाही.

44) सदर साहित्याची नोंद साठापुसतकात घेण्यात आलेली नसून त्यावर मुख्याधिकारी यांची स्वाक्षरी नाही त्यामुळे साहीत्याची अफरातफर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

45) तुलनात्मक तक्त्यावर मुख्याधिका-याची स्वाक्षरी करून प्रमाणित करण्यात आलेली नाही.

46) कंत्राट मिळाल्याबाबतचे करारनामा रु.500 ऐवजी रु.100 च्या मुद्रांक पेपरवर केल्याने रु.400 ची शासन हानी करण्यात झाल्याची दिसून येते. सदर रक्कम वसूल करून अनूपालन दर्शवावे.

वरील बाबीची पूर्तता करून अनूपालन दर्शवावे.

MRFISPM9301 (Ref No : 24, Hmm No : 1)

## *43 भांडार विभागातील अनियमीततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020**
**अनियमितता संख्या : 1**

*नगर परिषद स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ङ*

भांडार विभागातील स्थळपाहणी व साठा नोंदवही मधील तफावतीबाबत.

नगरपरिषद मलकापूरचे आर्थिक वर्ष 2019-2020 लेखापरीक्षण करत असताना भांडार विभागात स्थळपाहणी केली असता खालील तपशीलाप्रमाणे प्रत्यक्ष्zwj; स्थळपाहणी व साठानोंदवही मध्ये तफावत दिसुन आली.

| पावती पुस्तक प्रकार | प्रत्यक्ष्zwj; स्थळपाहणीत आढळून आलेला साठा | साठा नोंदवही नुसार साठा |
|---|---|---|
| सर्वसाधारण पावती पुस्तक | 17 | 19 |
| कराचे पावती पुस्तक | 15 | 14 |
| आठवडी बाजार | 100 | नवीन खरेदी केल्याची नोंद साठा नोंदवहीत घेतलेली नाही त्याचप्रमाणे मालसाठा नोंदवहीत शिल्लक साठयाची नोंद घेतलेली नाही त्यामुळे शिल्लक साठा किती आहे हयाबाबतीत अनुमानीत करता येत नाही. |
| विवाह नोंदणी<br>1)100 पावत्या असणारे पुस्तक<br>2) 50 पावत्या असणारे पुस्तक | 7<br>12 | एकुण 12 |

सदर तफावतीबाबत योग्य तो खुलासा करावा.

DATRKPM9501 (Ref No : 47, Hmm No : 1)

## *44 न प च्या अग्नीशमन वाहन दुरुस्ती खर्चातील अनियमीततेबाबत.*

**0**

**लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020**

**अनियमितता संख्या : 2**

*लेखा शीर्ष : वाहन नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 98800.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 98800.00/-

| |
|---|
| ***50)*** वाहनावार झालेल्या खर्चाची नोंद इतिहास पुस्तीकेत न घेता वरच्या वर करण्यात आला.<br><br>2.इतिहास पुस्तीका विहीत नमुन्यात नाही. |

नगर परिषद मलकापूर सन 2019-20 चे लेखापरीक्षणावेळी वाहन विभागांतर्गत अग्नीशमन वाहन दुरुस्ती खर्च देयकाची व नस्तीची पडताळणी केली. त्यानुसार

न.प.स्थायी समीती सभा ठराव क्र. 5(1) दिनांक 13.08.2019

न.प. आदेश जा.क्र. 2089/2019 दिनांक 16.08.2019

प्रमाणक क्रमांक 1212 दिनांक 30.10.2019 रक्कम 98800/- रुपये

वाहन क्रमांक MH 28 H 5168 व MH 28 H 5167

यावर पुढील प्रमाणे अभिप्राय देता येईल

47) वाहन क्रमांक MH 28 H 5168 ची दुरुस्ती दिनांक 20.08.2019 ला केल्याचे देयकात नमुद आहे मात्र वाहनाच्या इतिहास पुस्तिकेत तशी नोंद घेण्यात आलेली नाही. त्यामुळे खरच दुरुस्ती त्या तारखेस झालेली आहे की नाही याबाबत शाश्वती पटत नाही.
48) देयकानुसार अग्निशमान वाहनाची बॅटरी फेरबदल (replacement) न करता थेट खरेदी केल्याने जास्त कींमत दिल्याचे दिसून येते. यामुळे शासन निधीचा अपव्यय झाल्याचे निदर्शनास येते.
49) उपरोक्त वाहनाबाबत चालकाचे वाहन दूरुस्ती बाबत कोणतीही मागणी पत्र आढळून आलेले नाही.
50) वाहनाबाबत ठेवण्यात आलेल्या इतिहास पुस्तिकेचा नमूना शासनमान्य विहित नमूण्यात ठेवणे आवश्यक असतांना तशा प्रकारे ठेवण्यात आलेले नाही.

उपरोक्त बाबींची पूर्तता करून अनुपालन दर्शवावे.

MRFISPM9301 (Ref No : 25, Hmm No : 1)

## *45 मालमत्ता कराची फेर कर आकारणी उशीराने करणेबाबत.*

**00**
**लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020**
**अनियमितता संख्या : 1**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

1) नगर परिषद अधिनियम 1965 चे कलम 124 अन्वये मालमत्ता कराची फेर कर आकारणी चार वर्षातून एकदा करणे आवश्यक असतांना करआकारणी करण्यात आलेले नाही.

नगरपरीषद मलकापुर येथील सन 2019-20 या वित्तीय वर्षाचे लेखा परिक्षण केले असता सन 15-16 ते 18-19 नुसार चार वर्षासाठी करआकारणी करण्यात आलेली होती, त्यामुळे नविन कराची आकारणी सन 19-20 ते 22-23 पर्यन्तं करणे आवश्यंक असतांना नगरपरीषदेने कर आकारणी केल्याचे आढळत नाही , त्यामुळे नगर परिषद अधिनियम 1965 चे कलम 124 त्यामुळे नगर परिषदेचे आर्थिक नुकसान झालेले असून महसुली उत्पन्नापासून वंचीत राहिलेले आहे.

उपरोक्तं करआकारणी व मागणी रजिस्टंर ची वेळोवेळी लेखी तसेच तोडीं सुचना सुचना देउन सुध्दा मागणी रजिस्टरं लेखापरीक्षणास उपलब्धं केले नाही त्यामुळे नविन करआकारणी प्रमाणे कर वसुल केला किवां कसे याबाबत खात्री करता आली नाही तसेच वसुल केलेल्या कराची नोदं मागणी रजिस्टरं ला घेतली किवां कसे याची तपासणी करता आली नाही.सदर मागणी रजिस्टंर अनुपालनार्थ सादर करण्यात यावे.

DATDDSM8401 (Ref No : 38, Hmm No : 1)

## *46 वृक्षकराची रक्कम वृक्ष निधीचे स्वतंत्र खाते उघडुन अंदाजपत्रक तयार करणेबाबत.*

**00**
**लेखापरीक्षण वर्ष : 2019-2020**
**अनियमितता संख्या : 3**

*लेखा शीर्ष :00 नगर परिषद स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ङ*

| |
|---|
| 1) नागरी क्षेत्र झाडाचे जतन अधिनियम 1975 नुसार वृक्ष प्राधीकरणाचे गठण केले नाही.<br>2) वृक्ष प्राधीकरणाने वृक्षकराचे ठेवीसाठी स्वंतत्र राष्ट्रीयकृत बॅकेत खाते उघडणे आवश्यक असतांना स्वंतत्र बॅकेत खाते उघडल्याचे आढळत नाही.<br>3)सदर वृक्षकराचा खर्च हा नियमाप्रमाणे वृक्षलागवड व संगोपनासाठी केल्याचे आढळत नाही. |

सन 2019-20 हया आर्थीक वर्षाचे लेखापरीक्षण कालावधीमध्ये नगरपरीषदने उपलब्ध केलेल्या विवरणपत्र सादर न केल्यामुळे यावर अभिप्राय देता येत नाही.

1) नगरपरीषदेने वृक्षकराचे स्वंतत्र खाते उघडण्यात यावे.

2) महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडाचे जतन अधिनियम 1975 नुसार वृक्षकराची रक्कम वृक्ष निधीच्या स्वंतत्र खात्यात जमा करुन अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक आहे. परंतु असे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले नाही.

3) महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडाचे जतन अधिनियम 1975 नुसार नगर परीषदांनी वृक्ष प्राधीकरण अस्तित्वात आणावयाचे असुन नगर परीषद क्षेत्रात वृक्ष लागवड करणे, वृक्ष संगोपण करणे, वृक्ष विषयी कायदयाची अंमलबजावणी करण्याचे दायित्व्zwj; शासनाने नगरपरीषदेवर टाकले आहे. वरील बाबत अंदाजपत्रकामध्ये तरतुद करण्यात आलेले नाही. आवश्यक तेथे खर्च करण्यात येत नाही. वृक्ष कराचे निधीचे अनुशेष रजिष्टर तयार करण्यात आलेले नाही.

पूर्तता करुन अनुपालन दर्शवावे.

DATDDSM8401 (Ref No : 39, Hmm No : 1)

किरकोळ लेखा आक्षेप विवरणपत्रा बाबत लेखापरिक्षणांत आढळून आलेल्या किरकोळ स्वरुपाच्या लेखा आक्षेपाची पुर्तता लेखापरीक्षण कालावधीत वेळीच करुन घेतल्यामुळे अशा स्वरुपाचे लेखा आक्षेप विवरणपत्र निरंक समजण्यांत यावे सबब तसे विवरणपत्र जोडण्यांत आले नाही.

लेखापरिक्षण अहवालातील वसुली - निरंक

लेख्यांची स्थिती समाधानकारक आहे.

उत्तरे - या लेखापरिक्षण अहवालाचे अनुपालन मुंबई स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम 1930 चे कलम 10(1) मधील तरतुदीनुसार हा लेखापरिक्षण अहवाल प्राप्त झाल्यापासुन चार महिण्याचे आंत आक्षेपाची पुर्तता करुन अनुपालन अहवाल नगर परिषदेच्या ठरावासह मुख्याधिकारी यांचे मार्फत तीन प्रतीत सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा बुलडाणा यांचे कडे उपर्निदीष्ठ कालावधीचे आत न चुकता पाठवावा हा लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाल्याची पोच पावती लेखापरिक्षण अहवाल दिनांकासह या कार्यालयास कळवावी.

सहाय्यक संचालक
स्थानिक निधी लेखापरीक्षा
बुलडाणा

क्रमांक स्था 3ड:लेपअ न.प.मलकापुर/सन 19-20 /बुल/ 310 दिनांक - 18/10/2021

प्रतिलिपी

1) मा.सचिव नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई
2) मा. संचालक नगर पालीका प्रशासन महाराष्ट्र मुंबई
3) मा. महालेखाकार ( लेखा परिक्षा ) विभाग नागपूर-2
4) मा. आयुक्त अमरावती विभाग अमरावती
5) मा. जिल्हाधिकारी बुलडाणा
6) मा. संचालक स्थानिक निधी लेखापरीक्षा नवि मुंबई
7) मा.सहसंचालक ( म.न.पा.ले.प.) स्थानिक निधी लेखापरीक्षा मुंबई
8) मा.सहसंचालक लेखापरिक्षा स्थानिक निधी लेखा म.रा.अमरावती
9) मुख्याधिकारी नगर परिषद मलकापुर हयांना कार्यवाहीस्तव.
10) दप्तरी

सहाय्यक संचालक
स्थानिक निधी लेखापरीक्षा
बुलडाणा

Signature Not Verified
Digitally signed by
Vijay Abhiman Jawanjal
Date : 28-01-2022 12:55:18

VIJAY ABHIMAN JAWANJAL
सहाय्यक संचालक,
सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा
कार्यालय, बुलढाणा.

## *लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र*

| नाव | परिच्छेद क्रमांक |
|---|---|
| दिपक दिंगाबरराव सावंत, वरिष्ठ लेखापरिक्षक | 13, 14, 15, 16, 17, 18, 19, 20, 21, 22, 23, 31, 32, 36, 37, 45, 46 |
| संतोष रामकृष्ण लहाने, वरिष्ठ लेखापरिक्षक | 1, 10, 11, 2, 25, 26, 27, 28, 29, 3, 33, 34, 35, 38, 39, 4, 40, 41, 5, 6, 8, 9 |
| रविंद्र कल्याण पवार, कनिष्ठ लेखापरिक्षक | 12, 24, 30, 43, 7 |
| इम्रानखॉ सुभानखॉ पठान, कनिष्ठ लेखापरिक्षक | 42, 44 |

# विवरणपत्रे व जोडपत्रे

| अ.क्र. | परिच्छेद क्र. | आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1 | ---- | 2126.00 | ---- | ---- | 2126226.00 |
| 2 | 2 | ---- | 129423.00 | ---- | ---- | 1498604.00 |
| 3 | 3 | ---- | 139000.00 | ---- | ---- | 22665460.00 |
| 4 | 4 | ---- | 25463.00 | ---- | ---- | 2496475.00 |
| 5 | 5 | ---- | 15768.00 | ---- | ---- | 5388760.00 |
| 6 | 6 | ---- | 35952.00 | ---- | ---- | 57019.00 |
| 7 | 7 | ---- | 31062.00 | ---- | ---- | ---- |
| 8 | 8 | ---- | 23062.00 | ---- | ---- | 798254.00 |
| 9 | 9 | ---- | 15847.00 | ---- | ---- | 164591.00 |
| 10 | 10 | 2.00 | 13800.00 | ---- | ---- | 1265525.00 |
| 11 | 11 | ---- | 2923.00 | ---- | ---- | 306620.00 |
| 12 | 12 | ---- | ---- | 127987.00 | 6068.00 | ---- |
| 13 | 13 | 194872.00 | 1013.00 | ---- | ---- | 195885.00 |
| 14 | 14 | 176839.00 | 9409.00 | ---- | ---- | 186248.00 |
| 15 | 15 | 18705.00 | 3600.00 | ---- | ---- | 22305.00 |
| 16 | 16 | ---- | 2624.00 | ---- | ---- | 32054.00 |
| 17 | 17 | 95290.00 | 33410.00 | ---- | ---- | 128700.00 |
| 18 | 18 | ---- | 22087.00 | ---- | ---- | 22087.00 |
| 19 | 22 | ---- | 400.00 | ---- | ---- | ---- |
| 20 | 23 | ---- | 400.00 | ---- | ---- | ---- |
| 21 | 24 | ---- | 5157.00 | ---- | ---- | ---- |
| 22 | 30 | 36480.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 23 | 35 | ---- | 1188.00 | ---- | ---- | 471173.00 |
| 24 | 40 | ---- | ---- | ---- | ---- | 7098414.00 |
| 25 | 42 | 384339.00 | 400.00 | ---- | ---- | 384339.00 |
| 26 | 44 | 98800.00 | ---- | ---- | ---- | 98800.00 |
| **एकूण रक्कम** | | **1005327** | **514114** | **127987** | **6068** | **45407539** |

# नगर परिषद, मलकापूर जि. बुलडाणा

## वार्षिक गोषवारा : सन २०१९-२०

| अ.क्र. | शॉपींग कॉम्प्लेक्स नांव/ गाळयांची संख्या | थकीत | चालु मागणी | एकुण बाकी | झालेली वसुली | थकीत वसुली | शास्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बुलडाणा रोड<br>(खालचे गाळा)<br>दु.क्र. १ ते ३९,<br>जिना - १ ते ३ एकूण ४२ | ३५५६१० | ३०८९०४ | ६६४५१४ | २६९५०२ | ३९५०१२ | -- |
| २ | बुलडाणा रोड<br>(वरचा माळा)<br>दु.क्र. १ ते ३९,<br>एकूण ३९ | ४४५२६६ | १५४९०८ | ६००१७४ | -- | ६००१७४ | -- |
| ३ | आठवडी बाजार<br>(१ ला टप्पा)<br>दु.क्र. १ ते २९, जिना क्र. १ व २<br>एकूण ३१ | १०१८९७३ | २१८६८८ | १२३७६६१ | २२५१८९ | १०१२४७२ | १४०० |
| ४ | आठवडी बाजार<br>(२ रा टप्पा)<br>दु.क्र. १ ते २९,<br>एकूण २९ | ९११०५८ | २२२७२० | ११३३७७८ | ३११३६३ | ८२२४१५ | ६७४८ |
| | **एकुण गाळे १४१** | २७३०९०७ | ९०५२२० | ३६३६१२७ | ८०६०५४ | २८३००७३ | ८१४८ |

सहा. मिळकत व्यवस्थापक,
न.प. मलकापूर

मुख्याधिकारी
न.प. मलकापूर

# नगर परिषद मलकापूर

| मालमत्ता कर वसुली सन २०१९-२० | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| थकीत मागणी | चालु मागणी | एकुन मागणी | थकीत मागणीपैकी वसुली | चालु मागणीपैकी वसुली | एकुन वसुली | टक्केवारी |
| ९९८४२२९२ | ३२९२६०२५ | १३२७६८३१७ | १३८७३६३१ | ९४१९८२२ | २३२९३४५३ | १७.५४ |

मुख्याधिकारी
नगर परिषद, मलकापूर.
२५/९/२०२१

नगर परिषद कार्यालय: मलकापूर जिल्हा बुलडाणा
एप्रिल २०१९ ते मार्च २०२०

पाणीपट्टी

| मागणी | | | झालेली वसुली | | | मार्च २०२० अखेरची वसुली | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| थकीत | चालू | एकुण | थकीत | चालू | एकुण | थकीत | चालू | एकुण | |
| २४५३५३३८- | ७८२३८६३- | ३२३५९२०१- | २५५१४९५- | २५६६९६५ | ५११८४६०- | २१९८३९२३- | ५२५६८९८- | २७२४०८२१- | टक्केवारी १५.८१ |

मुख्याधिकारी
नगर परिषद मलकापूर.

विवरणपत्र 5 (अ) नगर परिषद ; मलकापूर

सन 2019-20 या वित्तीय वर्षाच्या अग्रीमाचे विवरणपत्र ~~पंचायत समिती :- अकोला~~

| वर्षनिहाय प्रलंबित अग्रीम | | | | | वित्तीय वर्षाचा गोषवारा |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | वर्ष | थकित अग्रीम | | | |
| 1 | 2019 - 20 | निरंक | | | मागील शिल्लक 2018-2019 ची |
| 2 | | निरंक | | | सन 2019-2020 मध्ये वितरीत केलेला अग्रीम |
| 3 | | निरंक | | | एकुण अग्रीम |
| 4 | | निरंक | | | सन 2019-2020 मध्ये वसुल झालेला अग्रीम |
| 5 | | निरंक | | | दि 31-03-2020 अखेर प्रलंबित अग्रीम |
| 6 | | | | | |
| एकुण | | | | | |

लेखापाल नगर परिषद, मलकापूर. लेखापरिक्षक, न.प. मलकापूर

विवरणपत्र 5 (ब)

सन 2019-2020 या वित्तीय वर्षाच्या ठेवीचे विवरणपत्र पंचायत समिती :- अकोला

| वर्षनिहाय प्रलंबित अग्रीम | | | | | वित्तीय वर्षाचा गोषवारा |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | वर्ष | ठेवी अग्रीम | | | |
| 1 | | | | | मागील शिल्लक 2018-19 ची |
| 2 | | | | | सन 2019-2020 मध्ये प्राप्त ठेवी |
| 3 | | | | | एकुण ठेवी |
| 4 | | | | | सन 2019-2020 मध्ये परत केलेल्या ठेवी |
| 5 | | | | | दि 31-03-2020 अखेर प्रलंबित ठेवी |
| 6 | | | | | |
| एकुण | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| | अ.क्र | मागील तपशिल | | चालु वर्षात दिलेले कर्ज | | एकुण | | चालु वर्षातील परतफेड | | शिल्लक राशी | | शेरा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कर्ज | व्याज | कर्ज | व्याज | कर्ज | व्याज | कर्ज | व्याज | कर्ज | व्याज | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |

विवरणपत्र क्रमांक 2 (ब)

नगर परिषद, मलकापूर जि. बुलढाणा

जिल्हा परिषदेनी दिलेली कर्ज (व्याजरहीत) सन 2019-20 जिल्हा निधी अभिकरण योजना

| | अ.क्र | मागील तपशिल | | चालु वर्षात दिलेले कर्ज | | एकुण | | चालु वर्षातील परतफेड | | शिल्लक राशी | | शेरा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कर्ज | व्याज | कर्ज | व्याज | कर्ज | व्याज | कर्ज | व्याज | कर्ज | व्याज | | |
| एम.डी.पी. व नवि 6(अ) | 1 | 2,95,01,072/- | — - | निरंक | निरंक | 2,95,01,072 | - | निरंक | निरंक | 295,01,072 | — | - | |
| एकात्मिक विकास | 2 | 9,88,000/- | — | निरंक | निरंक | 988000/- | - | निरंक | निरंक | 988000 | — | — | |
| | | | | | | | | | | | | | |

लेखापाल

लेखापरिक्षक, नगर परिषद मलकापूर

विवरणपत्र क्रमांक 2 (ब)

जिल्हा परिषदेनी दिलेली कर्ज (व्याजरहीत) सन 2019-20 जिल्हा निधी अभिकरण योजना

| | अ.क्र | मागील तपशिल | | चालु वर्षात दिलेले कर्ज | | एकुण | | चालु वर्षातील परतफेड | | शिल्लक राशी | | शेरा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कर्ज | व्याज | कर्ज | व्याज | कर्ज | व्याज | कर्ज | व्याज | कर्ज | व्याज | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |